अहवाल क्रमांक : १७९

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

जळगांव जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

## तेहतीसावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक १ जुलै, २०१९ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१९

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

जळगांव जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

## तेहतीसावा अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) ***रिक्त

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) ***रिक्त

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) *श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) **श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

* श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

** श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

*** डॉ. सुरेश ( भाऊ ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

# पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१३. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१६. श्री. अमित झनक, वि.स.स.

१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

२४. **रिक्त

२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठित करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची " कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

# पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१४. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१७. श्री. अमित झनक, वि.स.स.

१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा ‘समिती प्रमुख’ या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा तेहतीसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप ( Enormous range and complexity ) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे ( effective meaningful ) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन ( Executive ) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी ( Tone of administration ) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. ( They derive authority from the Legislature ) या समितीला “Mini Legislature” सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर ( irrespective of party affiliation ) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने ( Non-Party Basis ) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परीक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-०९ व सन २०११-१२ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने जळगाव जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने जळगाव जिल्हा परिषदेस दिनांक २५, २६ व २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी भेट देऊन श्री.कौस्तुभ दिवेगावकर, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने जळगाव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २८ ऑगस्ट, २०१८, दिनांक ३० जानेवारी, २०१९ व दिनांक ११ जून, २०१९ रोजी जिल्हा परिषद, जळगाव संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.विजय कुमार, अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग, श्री.अमिताभ गुप्ता, प्रधान सचिव, गृह विभाग, श्री.असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, श्री.एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.आर.व्ही.पानसे, सचिव ( प्रकल्प समन्वय ), जलसंपदा विभाग, श्री.दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.ला.रा.गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.किरण पाटील, उप सचिव, कृषी विभाग, श्री.खा.म.नानद, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.म.र.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.वि.वि.बेंद्रे, अवर सचिव, जलसंपदा विभाग, श्री.कि.शा.परब, उप सचिव, जलसंपदा विभाग, श्री.विजयकुमार कलवले, सह संचालक, जलसंधारण विभाग, श्रीमती सु.प्र.आहिरराव, सहायक संचालक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.संजीव कुमार, संचालक, महावितरण मंडळ, श्री.एन.व्ही.शिंदे, मुख्य अभियंता व प्रधान सचिव ( जलसंपदा ) यांचे प्रतिनिधी, श्री.सी.आर.गजभिये, मुख्य अभियंता व विकास ( पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ), श्री.आर.आर.माने, विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, नाशिक तसेच श्री.प्रताप मोहिते व श्री.सुनिल भोसले, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या जळगाव जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २७ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : २७ जून २०१९.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | एक | समितीने जळगाव जिल्हा परिषदेला भेट दिली असता जिल्ह्यातील विधानमंडळ सदस्य व जिल्हा परिषद पदाधिका-यांसमवेत झालेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबीसंदर्भात. | १ |
| (२) | दोन | आरोग्य, कृषी, पाणी पुरवठा व पशुसंवर्धन विभागासाठी तरतूद असतानाही निधी खर्च न करणेबाबत ( पंचायत समिती, जामनेर ). | ८ |
| (३) | तीन | जिल्हा परिषदेने समाजकल्याण विभागासाठी २०% व महिला व बालकल्याण विभागासाठी १०% तरतूद असणारा निधी खर्च न करणेबाबत ( पंचायत समिती, बोदवड ) | १० |
| (४) | चार | अंगणवाडी सेविका/मतदनीस यांची रिक्त पदे भरण्याबाबत ( पंचायत समिती, यावल ) | १२ |
| (५) | पाच | मौजे सुंदरनगर, ता.चाळीसगाव येथील गाव तळ्याची दुरुस्ती करणेसाठी प्रत्यक्ष अनुदान प्राप्त झाल्याखेरील कार्यारंभ आदेश दिल्याबाबत. | १४ |
| (६) | सहा | जिल्हा परिषद स्वःउत्पन्न उपकराच्या रकमा विलंबाने प्राप्त झाल्याबाबत | १९ |
| (७) | सात | समितीने शाळांना भेटी देते वेळी जिल्ह्यातील काही पंचायत समिती क्षेत्रातील शाळांचे किमान ५० टक्के वीज देयक प्रलंबित असल्यामुळे वीज पुरवठा बंद केल्याबाबत. | २९ |
| (८) | आठ | ग्रामीण पाणीपुरवठा अंतर्गत कार्यरत यांत्रिकी व भूजल विभागातील तीन कनिष्ठ अभियंत्यांची अस्थायी पदे नियमित केल्याबाबत. | ३३ |
| | | **परिशिष्ट** | |
| | | **समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | **३५** |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, जळगांव ( प्रशासन )

### समितीने जळगांव जिल्हा परिषदेला भेट दिली असता जिल्ह्यातील विधानमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसमवेत झालेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबी संदर्भात.

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर,२०१७ या कालावधीत जळगांव जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्ह्यातील पदाधिका-यांसोबत अनौपचारिक चर्चा करीत असताना सभापती, शिक्षण, क्रीडा व अर्थ विभाग यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले की, राज्यातील शाळा डीजीटल केल्या जात आहेत. शाळांचे डिजीटलायजेशन करावे, ही चांगली बाब आहे. परंतु विद्यार्थ्यांना भौतिक सोयीसुविधा देखील मिळणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळेमध्ये खेळाचे मैदान आवश्यक आहे, तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरिता सर्व शाळांना संरक्षण भिंतीची आवश्यकता आहे. यासंदर्भात समितीद्वारे प्रयत्न करण्यात येईल, असे समितीस आश्वासित केले. यावर सभापती, समाजकल्याण, जिल्हा परिषद जळगांव यांनी माहिती दिली की, दलित वस्त्यांमध्ये पेवर ब्लॉक बसविण्याची आवश्यकता आहे. तसेच सौर ऊर्जेवर चालणारी जल शुद्धीकरण यंत्रणा बसविण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात समितीद्वारे प्रयत्न करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

सभापती, समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद जळगांव यांनी समितीला पुढील प्रमाणे विशद केली की, पूर्वी ग्रामपंचायतींच्या कामांकरिता निविदा काढण्यात येत होत्या. परंतु आता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे आदेश काढले आहे की, संपूर्ण जिल्ह्यामध्ये एकच निविदा काढण्यात येईल. याबाबत शासनाचा शासन निर्णय नसताना असे केले जाणार आहे. आतापर्यंत प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी ई-निविदा झालेल्या आहेत. प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी वेगवेगळी निविदा ठेवली तर ब-याच लोकांना रोजगार उपलब्ध होतो. संपूर्ण जिल्ह्यासाठी एक निविदा न काढता पूर्वीप्रमाणेच ग्रामपंचायतीच्या निविदेची प्रक्रिया सुरू ठेवण्याबाबत समितीने सहकार्य करावे, अशी त्यांनी विनंती केली. जळगाव जिल्ह्यातील प्राथमिक शाळांना संरक्षण भिंतीची आवश्यकता आहे. तसेच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा खेळातील सहभाग वाढण्यासाठी व होतकरू खेळाडूंना वाव मिळण्यासाठी खेळाकरिता आवश्यक असलेले सर्व साहित्य शाळांमध्ये उपलब्ध होण्याची आवश्यकता आहे. जिल्ह्यात कोणकोणत्या योजना राबविण्यात येणार आहे, कोणते साहित्य आणावयाचे आहे व इतर बाबींकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी जिल्हा परिषदेच्या सभासदांना विश्वासात घेत नाहीत. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे देखील सदस्यांना विश्वासात घेत नाहीत. जिल्हा परिषदेचा विकास करण्यासाठी सर्व विभागांच्या अधिका-यांनी सदस्यांना विश्वासात घेऊन कामे केली पाहिजे.

उपाध्यक्ष तथा सभापती, कृषि व पशुसंवर्धन दुग्धशाळा समिती यांनी समितीस विशद केली की, जिल्हा परिषदेकडे निधी नाही. जिल्हा परिषदेची मागच्या आर्थिक वर्षातील तरतूद पूर्णतः खर्च झाली आहे. जिल्हा परिषद ग्रामीण भागाचा कणा आहे. मात्र जिल्हा परिषदेमध्ये सर्व क्षेत्रांसाठीची तरतूद तुटपुंजी आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदस्यांचे प्रशिक्षण झाले आहे का? यावर उपाध्यक्ष तथा सभापती, कृषि व पशुसंवर्धन दुग्धशाळा समिती यांनी यशदा येथे सदस्यांचे प्रशिक्षण झाले आहे, असे होकारात्मक उत्तर दिले असता प्रशिक्षणामध्ये लेखाशिर्षा संदर्भात समजावून सांगितले आहे काय असा समितीने प्रश्न उपस्थित केल्यावर उपाध्यक्ष तथा सभापती, कृषि व पशुसंवर्धन दुग्धशाळा समिती यांनी समितीस होय असे उत्तर दिले.

सभापती, समाजकल्याण समिती यांनी अशी माहिती विशद केली की, दलित वस्तीमध्ये रस्ते करण्याऐवजी पेवर ब्लॉक बसविणे गरजेचे आहे. दलित वस्तीमध्ये सौर ऊर्जेवर चालणारे जल शुद्धीकरण यंत्र तसेच संरक्षक भिंत बांधणे गरजेचे आहे. मात्र सदर बाबी लेखाशिर्षामध्ये घेण्यात आलेल्या नाहीत. एसआरमध्ये रस्त्यांच्या संदर्भात निकष लावण्यात आले आहेत. शासनाने दीड किलोमीटर अंतराचेच रस्ते घेण्याचे निकष लावले आहेत. त्यामुळे महामार्गापासून काही अंतरावर असलेल्या गावाला जोडणारे रस्ते बांधण्यात अडचणी निर्माण होणार आहेत. गावापर्यंत पोहचण्याचे रस्ते दीड किलोमीटरच असतील असे नाही, त्यामुळे कमी अंतराचेही रस्ते घेण्याच्या संदर्भात विचार झाला पाहिजे. पूर्वी ३ लाख रुपयांपर्यंतचे काम ग्रामपंचायत स्तरावर होत होते. त्यामुळे कामे विभागून देता येत होती. मात्र आता ई-निविदा करण्याबाबत सांगण्यात आले आहे. तत्संदर्भात शासनाने कोणताही निर्णय जाहीर केलेला नाही. सध्या शिक्षकांच्या बदल्यांच्या संदर्भात फक्त आयुक्तांनाच अधिकार आहेत, ते अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे देखील असावेत.

यानंतर सभापती, क्रीडा, शिक्षण व अर्थ समिती यांनी समितीस विशद केली की, शिक्षण व क्रीडा ही राज्यव्यापी जबाबदारी आहे. आम्ही ग्रामीण भागात राहतो. १४ व्या वित्त आयोगाचा १०० टक्के पैसा ग्रामपंचायतींना वर्ग करण्यात आला आहे. शासनाने नियमावली तयार केली आहे. ग्रामसभेत कृती आराखडा करून काम करावे लागत आहे. ग्रामीण भागात काम सुरू करायला गेलो तर ग्रामपंचायतीमध्ये गोंधळ होतो. कामे सुरू करताना भांडणतंटा होतो. त्यामुळे विकास होत नाही. त्यामुळे नियंत्रणासाठी पंचायत समिती, जिल्हा परिषद, राज्य शासन यांचे प्रतिनिधीत्व असावे. शिक्षण विभागात ई-लर्निंग, ज्ञानरचना, क्रीडा विषयक शिक्षण देण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होतो. विद्यार्थ्यांचा शारीरिक

विकास होण्यासाठी क्रीडांगणाची गरज आहे. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रीडांगण असले पाहिजे. विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी खेळाची साहित्ये असली पाहिजेत. शाळांची नैसर्गिक वाढ झाली पाहिजे. जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेला संरक्षण भिंत असली पाहिजे तरच विद्यार्थ्यांचा विकास होणार आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेच्या आवारात, शाळा बंद असताना, लघुशंका, शौच करण्याचे, जुगार खेळण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेला संरक्षण भिंत असली पाहिजे. माझ्या मते संरक्षण भिंत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढली आहे तर संरक्षण भिंत नसलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता खालावली आहे. आपल्याला ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी भागातील विद्यार्थ्यांबरोबर आणायचे असेल तर या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देणे खूप गरजेचे आहे.

शिक्षकांच्या बदल्यांच्या संदर्भातही एक विषय आहे. सदर बाबतीत शिक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी आहे. शैक्षणिक वर्ष अर्धे संपले आहे. न्यायालयीन प्रकरणे असल्यामुळे त्या प्रमाणात बदल्या झालेल्या नाहीत. आता बदल्या केल्यामुळे शिक्षकांचे शालेय कामामध्ये लक्ष लागत नाही. त्यामुळे यावर्षी बदल्या थांबवून एप्रिल, मे महिन्यात कराव्यात.

विद्यार्थ्यांना ई-लर्निंगच्या माध्यमातून शिकविले जाते. ई-लर्निंगसाठी वीज पुरवठा लागतो. शाळांना वीज पुरवठा व्यापारी तत्वावर केला जातो. शाळांना कोणतेही उत्पन्न नाही. शाळांची व्यापारी तत्वावर देण्यात येणारी वीज देयके भरण्याची ताकद नाही. त्यामुळे वीज जोडणी तोडण्यात येतात. परिणामी विद्यार्थ्यांना ई-लर्निंगच्या माध्यमातून शिकविण्यास त्रास होत आहे. त्यामुळे अशी मागणी आहे की, शाळांचे वीज देयक साध्या पद्धतीने आकारले जावे. जिल्हा परिषदेने डिजिटल अभ्यासक्रम कार्यक्रम राबविला आहे. दुस-या जिल्हा परिषदांनीही मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी सदरचा कार्यक्रम राबविला आहे. जिल्हा परिषदेमध्ये क्रीडा विषयक नियोजन नाही. राज्याचे क्रीडा अधिकारी जिल्हा परिषदेतील पदाधिक-यांना विश्वासात घेत नाहीत. जिल्हा परिषदेच्या क्रीडा विषयक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत.

आमच्या काही विषयांच्या बाबतीत तक्रारी आहेत. अर्थ विभागाशी संबंधित काही तक्रारी आहेत. पदाधिक-यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी, विश्वासात घेत नाहीत. आम्हाला विषयाशी संबंधित कोणतीही नस्ती दाखविली जात नाही. सर्व विषयांच्या संदर्भातील निर्णय स्वतःच घेतले जातात. पदाधिक-यांना देखील विषयांच्या संदर्भातील माहिती असली पाहिजे. पदाधिकारी त्या नस्तीवर स्वाक्षरी करणार नाही मात्र आम्हाला ती माहितीस्तव, अवलोकनार्थ दाखविली पाहिजे, अशी आमची मागणी आहे. जिल्हा परिषदेच्या संदर्भातील कोणताही निर्णय घेताना पदाधिका-यांना त्या संदर्भात माहीत असले पाहिजे. अधिकारी व पदाधिकारी दोघांच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या संदर्भातील प्रत्येक काम झाले पाहिजे, असे आमचे मत आहे. आपण जिल्हा परिषदेच्या प्रशासनाला तशा सूचना दिल्या पाहिजेत.

पदाधिका-यांना जिल्हा परिषदेचा माध्यमिक शिक्षण विभाग नेहमी सांगतो की, पदाधिका-यांचा त्या विषयाशी काही संबंध नाही. मग येथे माध्यमिक शिक्षण विभाग कशासाठी ठेवला आहे, सदर बाबतीत देखील आपण प्रशासनाला सूचना दिल्या पाहिजेत. सर्व विषयांच्या संदर्भातील निर्णय सभापती व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतले पाहिजेत. समायोजनाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची विचारणा होत नाही. माध्यमिक शिक्षण विभागातील पदोन्नतीच्या संदर्भातील मान्यतेच्या वेळी कोणत्याही प्रकारची विचारणा होत नाही. पदाधिकारी ग्रामीण भागात काम करणारे लोकप्रतिनिधी आहेत. त्यामुळे त्यांनी या संदर्भात विचारणा केल्यास तत्संदर्भात उत्तर द्यावे लागणार आहे. हा विषय सहानुभूतिचा आहे. प्रशासनाकडून आता जे काही होत आहे, ते पुन्हा होणार नाही, याची प्रशासनाने काळजी घ्यावी. आपण या संदर्भात प्रशासनाला सांगावे. कोणत्याही विषयाची नस्ती पदाधिका-याकडून जावी, अशी मागणी व विनंती आहे. सदर दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने संबंधितांना पुढीलप्रमाणे सूचना दिल्या की, शिक्षकांच्या बदल्यांच्या संदर्भातील विषय महत्त्वाचा आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. शासनाकडून या संदर्भात मुदतवाढ मिळाली पाहिजे. शिक्षकांच्या बदल्या उन्हाळ्याच्या सुट्टीत व्हाव्यात, असेच सर्वांना वाटत आहे. सदर विषयाच्या बाबतीत पंचायती राज समितीचा एक ठरावच करून घेऊ. आपण सर्वांनीच ही बाब लक्षात घेतली पाहिजे. कोणत्याही विषयाच्या संदर्भातील बैठकीच्या सूचना देणे किंवा फाईलवर सही करणे, हेच सभापती यांचे काम नसले पाहिजे. केवळ कार्यवृत्तावर सही करण्यापुरतेच सभापतींचे काम नाही. विषय समितीच्या सभापतींनी तपासणीसाठी एखादी नस्ती मागितली तर ती देणे प्रशासनाला बंधनकारक आहे की नाही? यावर नस्ती सादर करणे बंधनकारक आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले. यावर समितीने अशी विचारणा केली की, जर हे बंधनकारक असेल तर प्रशासनाने त्यानुसार कार्यवाही करावयास पाहिजे होती. अर्थ, बांधकाम व शिक्षण समितीच्या सभापतींनी जो मुद्दा मांडला तो अतिशय महत्त्वाचा आहे. तसेच या मुद्द्याच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडले आहे. एकंदरीत आजच्या चर्चेवरुन असे निदर्शनास येते की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत समन्वय साधत नाहीत. किंबहुना ते सभापतींना दाद देत नाहीत. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून खर्च करण्यात येत असलेला वा विनियोग करण्यात येत असलेला तपशील सभापतींना देत नाहीत. जर मुख्य लेखा व वित्त अधिका-यांकडून अर्थ विभागाच्या सभापतींना कोणतीही माहिती दिली जात नसेल तर त्या समितीला अर्थच राहणार नाही. जिल्हा परिषदेची अर्थ समिती अत्यंत महत्त्वाची आहे. परंतु अनेक ठिकाणी अर्थ समितीच्या सभापतींना प्रशासनाकडून विश्वासात घेतले जात नाही. मुळात या संदर्भात कायद्यामध्ये तरतूद आहे.

पंचायती राज समिती ही नव्याने घटित झालेली आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष किंवा सभापती यांना विशेष अधिकार प्राप्त आहेत. कायदा आणि नियमान्वये त्यांना अधिकार देण्यात आलेले आहे. परंतु त्या नियमांचे पालन होत नसेल तर समितीच्या माध्यमातून मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि विभागाच्या सचिवांना सूचना देण्यात येतील. तसेच दुसरी बाब अशी की, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शाळा बांधकाम करण्यात आल्यानंतर पुढील काम हे संरक्षक भिंत बांधण्याचे असते. परंतु शाळांना संरक्षक भिंत बांधण्यात आल्या नसल्याचे सभापतींनी समितीच्या निदर्शनास आणून दिले आहे. आता खनिकर्मच्या संदर्भात नवीन प्रतिष्ठान तयार झाले आहे. त्या अंतर्गत ६०:४० असे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. शाळांचा सर्वांगीण विकास, डिजीटलायझेशन, पाण्याची व्यवस्था इत्यादी गोष्टी ६० टक्केच्या प्रमाणामध्ये समाविष्ट केल्या आहेत. या बरोबरच शाळांचे मैदान विकसित करण्याच्या बाबतीत योजना अस्तित्वात आहेत. परंतु समन्वयाचा अभाव असल्यामुळे यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता सुरू आहे. आम्ही जिल्हा नियोजन समितीचे सदस्य असल्यामुळे आम्हाला सर्व बाबी माहीत आहेत. अर्थ समितीच्या सभापतींनी जे मुद्दे निदर्शनास आणून दिले आहेत ते गंभीर आहेत. जिल्हा परिषदेच्या निधीचा विनियोग योग्यप्रकारे झाला पाहिजे आणि प्रत्येक पैशाबाबतची माहिती मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी सभापतींना दिली पाहिजे. समिती सभापतींना विचारू इच्छिते की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे ऐकत नसल्याची बाब आपण मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या निदर्शनास आणून दिली होती काय, यावर सभापती, शिक्षण, क्रीडा व अर्थ विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांनी समितीला माहिती दिली की, त्यांच्याकडे नस्तीच येत नाही, त्यामुळे कोणता पैसा कुठे खर्च केला जात आहे याची माहिती होत नाही. यावर समितीने विचारणा केली की, मुळात मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कार्यालय प्रमुख म्हणून याकडे लक्ष देण्याची जबाबदारी होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढील प्रमाणे विदित केले की, आता जिल्हा परिषदेने ऑनलाईन फाईल ट्रॅकींग सिस्टीम सुरू केली आहे. सभापतींनी नस्ती मागितल्यानंतर ती त्यांच्याकडे द्यावयास पाहिजे. मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी सभापतींकडे फाईल पाठविली नाही तर ही बाब ट्रॅकींग सिस्टीममध्ये निदर्शनास येईल. यावर समितीने विचारणा केली की, सभापतींनी उपस्थित केलेला मुद्दा रास्त आहे. ही बाब राज्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. या विषयाला समिती गांभीर्याने घेत असून या संदर्भात विभागीय सचिवांना सूचना देण्यात येतील, असे समितीने संबंधितांना निदेश दिले. यावर सभापती, शिक्षण, क्रीडा व अर्थ विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये गरिबांची मुले शिक्षण घेतात. आता स्वयं-अर्थसहाय्यित तत्त्वाच्या आधारावर शाळांना परवानगी दिली जाते. परंतु आजच्या घडीला अनेक शाळा परिसरामध्ये अतिक्रमण झालेले आहे. शाळांमध्ये झालेले अतिक्रमण काढण्याच्या सूचना राज्य सरकारच्या माध्यमातून देण्यात आल्या तर शैक्षणिक गुणवत्तेत फरक पडेल. आज अनेक शाळा परिसरामध्ये गुरे-ढोरे बसलेली दिसतात. यानंतर सभापती, समाजकल्याण समिती यांनी समितीला विदित केले की, शिक्षकांच्या बदल्यांचे अधिकार आता शिक्षण आयुक्तांकडे देण्यात येत आहे. आमची सूचना आहे की, शिक्षकांच्या बदल्यांचे थोडेफार अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सुद्धा ठेवण्यात यावेत. आमची विनंती आहे की, शिक्षण आयुक्तांकडे शिक्षकांच्या बदल्यांसंदर्भात संपूर्ण नव्हे तर काही प्रमाणात अधिकार दिले पाहिजेत अशी समितीला विनंती केली असता, यावर समितीने विचारणा केली की, सभापतींना विचारू इच्छितो की, आजही शाळांच्या जागेवर अतिक्रमण आहे काय, यावर सभापती, शिक्षण, क्रीडा व अर्थ विभाग यांनी होय असे उत्तर दिले असता, समितीने अशी विचारणा केली की, शाळांच्या जागेवर अतिक्रमण असेल तर ते अतिक्रमण काढण्याचे अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिका-यांना आहेत. मुळात अतिक्रमण काढण्याचा विषय शासन स्तरावर येताच कामा नये. समितीला वाटते सभापतींनी या संदर्भात ठराव करावयास पाहिजे. असे समितीने संबंधितांना निदेश दिले असता, सभापती, शिक्षण, क्रीडा व अर्थ विभाग यांनी संमती दर्शविली. यावर सभापती, पंचायत समिती, रावेर यांनी समितीस विनंती केली की, १४ व्या वित्त आयोगाचा जास्तीत जास्त निधी पंचायत समित्यांना उपलब्ध करून द्यावयास पाहिजे. यावर जिल्हा नियोजन समितीमध्ये ७० टक्के प्रतिनिधी जिल्हा परिषदेतून आलेले असतात, त्यांच्या मागणीकडे फारसे लक्ष दिले जात नाही. अशी माहिती उपाध्यक्ष तथा सभापती, कृषी व पशुसंवर्धन, दुग्धशाळा समिती यांनी समितीला दिली. यावर समितीने हा विषय पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावा अशी सूचना केली. लेखाशीर्ष ५०५४ मध्ये जन सुविधा, नागरी सुविधा व ३०५४ अंतर्गत सर्व अधिकार जिल्हा परिषदेला आहेत. जिल्हा परिषदेने ठराव करून तो पाठवायचा आहे असे संबंधितांना निदेश दिले.

कृषीबाबत पाहिले तर जिल्हा परिषदेमार्फत एच.पी.सोलार पंप देतो. त्याची बाजारातील किंमत १७०० ते २००० पर्यंत आहे. डीबीटीच्या माध्यमातून द्यायचे म्हटले तर लाभार्थ्याने स्वतः पंप विकत घेऊन देयक सादर करावयाचे आहे. ही बाब खूप अडचणीची आहे. निविदा काढण्यासाठी रुपये ३,००,००० पर्यंतची मर्यादा आहे. तशी मर्यादा जिल्हा परिषदेने निश्चित करणे आवश्यक आहे. रुपये ३,००,००० पेक्षा अधिक रुपयांची खरेदी असेल तर निविदा काढून खरेदी करावी. अशी माहिती सभापती, समाजकल्याण समिती, जळगांव यांनी समितीला दिली.

घरकुलाचा विषय आहे. योजनेचे पूर्ण नियंत्रण मुंबईहून होते. ऑनलाईन निधी पाठविला जातो. त्याऐवजी जिल्हा पातळीवर निधी पाठविण्यात आला तर निधी लवकर वितरित होऊ शकतो. सहा-सहा महिने निधी मिळत नाही. अशी माहिती सभापती, पंचायत समिती, चोपडा यांनी समितीला दिली.

शालेय पोषण आहाराचा विषय संपूर्ण राज्यात गाजला आहे. माल निकृष्ट दर्जाचा पुरविला गेला. असल्याचे सीईओ यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यांनी सुद्धा सांगितले की, माल निकृष्ट दर्जाचा आहे. पुरवठादार व अधिका-यांनीही मान्य केले की, माल कालबाह्य झालेला आहे. चालू वर्षाचा माल सुद्धा निकृष्ट आहे. असे असताना चांगला माल आला असल्याचे प्रमाणपत्र दिले जाते. पुरवठादार स्वतः लिहून देतो की, कालबाह्य झालेला माल आहे. अशी माहिती सभापती, भुसावळ पंचायत समिती यांनी समितीला दिली असता या संदर्भात चौकशी करून कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

रोजगार हमी योजने अंतर्गत शेतातील पांदण रस्ते केले जातात. आज रोहयोमधून कोणतेही काम होत नाही. त्यामुळे शेतक-यांना अडचणीचा सामना करावा लागतो. रस्त्यात एक ते दीड फूट खड्डे पडले आहेत अशी माहिती सदस्य, जिल्हा परिषद, जळगांव यांनी समितीला दिली असता समितीने विचारणा केली की, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण योजनेमध्ये पांदण रस्ते करण्यात आले नाही काय? यावर सदस्य, जिल्हा परिषद, जळगांव यांनी नाही असे उत्तर समितीला देत असताना कामासाठी मजूर उपलब्ध होत नाहीत, ही अडचण आहे अशी माहिती दिली. यावर समितीने असे सुचविले की, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये आपण पालकमंत्र्यांना सूचना करावी. नाविन्यपूर्ण योजनेतून ठराव करावयास सांगून काही निधी पांदण रस्त्यासाठी वर्ग करण्यात यावा. नागपूर जिल्ह्यामध्ये ही योजना राबविली आहे. रोहयोच्या माध्यमातून पांदण रस्ते करता येतात. ६०:४० चे प्रमाण जिल्हा स्तरावर देखभाल केला तर रस्ता होईल आणि पुढील वर्षी ब्लँकेटींग करता येते. ६०:४० चा रेशो मेन्टेन करून गावात सिमेंट रस्ता पण करता येतो. अशा वरीलप्रमाणे सूचना समितीने संबंधितांना केल्या. राष्ट्रीय ग्रामीण स्वच्छता अभियान राबविले जाते. केंद्रातून येणारा निधी जिल्हा परिषद व पंचायत समितीकडे वर्ग होतो. परंतु काम कुठे चालले आहे याची माहिती झाली पाहिजे असे सभापती, शिक्षण, क्रीडा व अर्थ विभाग जिल्हा परिषद, जळगांव यांनी समितीला अवगत केले. जिल्हा परिषदेमध्ये जल संधारण व स्वच्छता समिती आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी त्या समितीचे सचिव आहेत असे समितीने विचारले असता, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि ) यांनी सांगितले की, नियमित विषय आहे. पुढे समितीने अशीही विचारणा केली की, या संदर्भात चर्चासत्र आणि लोकप्रतिनिधींसोबत बैठक झाली का? यावर बैठक नियमित होत असते. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी माहिती दिली. तुम्ही बैठक न घेतल्यामुळे प्रश्न उपस्थित झाला. सभापती समितीसमोर जे सांगत आहेत, त्यावरुन बैठक घेण्याची जबाबदारी तुमची आहे, विषय समितीचे सभापती अध्यक्ष आहेत. जे सत्य आहे तेच सांगावे. एका तपानंतर पंचायती राज समिती जळगाव जिल्ह्याच्या दौ-यावर आलेली आहे. त्यामुळे अधिका-यांनी मोघम उत्तर देऊ नये. बैठक घेऊन या प्रक्रिया झाल्या पाहिजेत. ही आपली जबाबदारी आहे. असे समितीने निदेशित केले असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी संमती दर्शविली. यानंतर जळगाव जिल्हा जागृत जनमंच यांनी समितीला अवगत केले की, शौचालय योजनेच्या लाभार्थ्यांची यादी इंग्रजी भाषेतून प्रसिद्ध केली जाते. जे लाभार्थी आहेत त्यांना मंजुरी/नामंजुरीचे पत्र पाठविले गेले पाहिजे. उत्तर दिले जाते की, अभिलेखे उपलब्ध नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली !**

(१) जिल्ह्यातील शाळेत खेळाचे मैदान तसेच सर्व शाळांना संरक्षण भिंत उभारण्याबाबत शासनाने कोणती उपाय योजना केली आहे.

(२) जिल्ह्यात योजना राबवितांना अथवा कोणतेही साहित्य खरेदी करतांना इतर बाबीकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे जिल्हा परिषद सदस्यांना विश्वासात घेत नाहीत हे खरे आहे काय, असल्यास या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

(३) दलित वस्तीतील रस्ते मुख्य लेखाशिर्षाखाली न घेण्याची कारणे काय आहेत ?

(४) तसेच दलित वस्तीमध्ये रस्ते ऐवजी पेवर ब्लॉक, सौर ऊर्जेवर चालणारे वॉटर फिल्टरची सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने कोणती उपाय योजना केली आहे ?

(५) शालेय पोषण आहार धान्यादी मालाचे साहित्य कालबद्ध झाल्याने पुरवठादार यांनी लेखी लिहून दिले असतांना त्यांना चांगला माल असल्याचे प्रमाणपत्र देणा-या संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :**

(१) ज्या शाळांकडे स्वतःची जागा उपलब्ध आहे अशा शाळांना जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्या मार्फत राबविण्यात येणा-या क्रिडांगण विकास योजने अंतर्गत प्रस्ताव सादर करून शाळेसाठी खेळाचे मैदान तयार करणे विषयी सूचित केलेले आहे.

तसेच जिल्हा परिषद शाळांना संरक्षक भिंत उपलब्ध होणे कामी दर वर्षी सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत बजेट मध्ये मागणी नोंदविण्यात येते. तसेच या व्यक्तीरिक्त जिल्हा नियोजन समिती मार्फत सन्माननीय मंत्री महोदय महाराष्ट्र शासन, सन्मा. खासदार, सन्माननीय आमदार सो. यांच्या मार्फत सुद्धा शासनाकडे जिल्हा परिषद शाळांना संरक्षक भिंत उभारण्यासाठी सतत पाठपुरावा करणे सुरू आहे.

(२) जिल्हा परिषदेतील पदाधिका-यांच्या मंजूरीसाठी नस्त्या सादर केल्या जातात. शासन पत्र क्रमांक-झेडपी-२०११/प्र.क्र. ६०१/११/ वित्त-९ ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ चे मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम क्र. ५४, कलम क्र. ९१ नुसार अनुक्रमे जिल्हा परिषदांच्या अध्यक्ष व सभापती यांचे अधिकार व कार्ये नमूद केलेली आहेत. तसेच कलम ९५ मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार व कार्ये नमूद केले असून कलम ९९ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहितेतील परिशिष्ट-१ मधील तरतूदीप्रमाणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अधिकार व कार्ये नमूद केलेली आहेत. प्रत्येक प्राधिका-याचे अधिकार व कार्ये कायदयाने निश्चित केलेल्या असून त्या अधिकारानुसारच प्रत्येक प्राधिका-याने काम करावयाचे आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष व समिती सभापती यांना कलम ५४(४) (ब), ९१(१)(२) नुसार त्यांचे अधिनस्त असलेल्या कामकाजांचे संबंधात अभिलेख मागण्याचे अधिकार आहेत. मात्र विभागप्रमुखाच्या अधिकार कक्षेत येणा-या नस्त्या/प्रस्ताव मंजूरी पूर्वी विषय समितीच्या सभापतींच्या वा अध्यक्षांच्या संमतीसाठी ठेवण्याची नियमात तरतूद नाही.

(३) या बाबत नमूद करण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक दवसू २०११/प्र.क्र./ ४४२/अजाक/मंत्रालय मुंबई दिनांक ५ डिसेंबर, २०११ मधील परिशिष्ट अ नुसार अनुसरून दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत पाणीपुरवठ्याची कामे, मलनिःस्सारण, वीज, गटार बांधणे, अंतर्गत रस्ते, पोच रस्ते, पर्जन्य व पाण्याचा निचरा व मुलभूत गरजा पूर्ण झाल्यानंतर समाज मंदिराचे काम देण्यात यावे असे नमूद आहे.

(४) सौर ऊर्जेवर चालणारे वॉटर फिल्टर, पेवर ब्लॉक, संरक्षण भिंत या कामाचाही समावेश या कामामध्ये आयुक्तव्हावा असा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून पुणे या महाराष्ट्र राज्य, समाज कल्याण विभागाकडे सादर केलेला आहे.

(५) पुरवठादाराचे गोदामावर पोलिसांनी छापा टाकला असता चांगल्या मालाचे वर्गीकरण करून मुदतबाहय माल त्याच गोदामामध्ये वेगळया भागात नष्ट करण्यासाठी साठवून ठेवला होता ही प्रक्रीया दरमहा सुरू असते. तद्नंतर मुदतबाहय माल नष्ट करण्यात आलेला आहे. मुदतबाहय माल शाळा स्तरावर पुरविण्यासाठी साठविण्यात आला नव्हता त्यामुळे पुरवठादाराने सद्यःस्थिती नमूद केली असून त्याबाबत कोणत्याही अधिका-याने चांगला माल असल्याचे प्रमाणपत्र दिले नाही. म्हणून कार्यवाही करण्याचा प्रश्न येत नाही.

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय.

(१) **शालेय शिक्षण विभागाचा अभिप्राय-** सन २०१७-१८ मधील युडायस डाटा नुसार जळगांव जिल्ह्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १९२३ शाळांपैकी १८४६ शाळांमध्ये खेळाचे मैदान उपलब्ध असून, ७७ शाळांना खेळाचे मैदान नाही. ज्या शाळांना खेळाचे मैदान उपलब्ध नाही, अशा शाळांना शाळा व्यवस्थापन समिती मार्फत ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका व खाजगी मालक इ.कडे उपलब्ध करून घेण्याबाबत दिनांक २९-०६-२०१३ च्या शासन निर्णयान्वये आदेश देण्यात आले आहेत.

(२) **शालेय शिक्षण विभागाचा अभिप्राय-** ज्या शाळांना संरक्षण भिंत उपलब्ध नाही तेथे तारेचे कुंपण, डिडोनिया/मेहंदीसारख्या वनस्पतीचे कुंपण असावे अशा सूचना दिनांक २९-०६-२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.

(३) **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय-** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

(४) **पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा अभिप्राय-** ज्या गावात पिण्याचे पाणी गुणवत्ता बांधित आहे अशा ठिकाणी योग्य ते यंत्र पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत बसविले जातात.

(५) **शालेय शिक्षण विभागाचा अभिप्राय-** या बाबत शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) जिल्हा परिषद, जळगांव यांनी दिलेल्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे. शाळा स्तरावर धान्यादी माल पुरवतांना धान्यादी मालाची मुदत (Expiry Date) किमान एक वर्षापर्यंत असावी. अशी अट नव्याने होणा-या करारनाम्यात अंतर्भुत करण्यात येणार आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्तमुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्ह्यातील शाळेत खेळाचे मैदान तसेच सर्व शाळांना संरक्षक भिंत उभारण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे? शालेय शिक्षकांना सांगितले आहे की, या शाळांना संरक्षक भिंत उपलब्ध नाहीत तिथे तारांचे कुंपण असावे, डिडोनिया/मेहंदीसारख्या वनस्पतीचे कुंपण असावे अशा सूचना दिनांक २९ जून, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत. यावर यामध्ये आपल्याकडे जो लेटेस्ट डेटा उपलब्ध आहे, त्यानुसार

बहुतांश शाळांमध्ये मैदानाची सुविधा झालेली आहे. सन २०१७-१८ मध्ये शिक्षण विभागाने त्याचा आकडा दिलेला आहे. आपण युडाईजचा डेटा बघितला तर आपल्याकडे एकूण १९२३ शाळांपैकी १८४६ शाळांमध्ये प्रत्यक्षपणे खेळाचे मैदान उपलब्ध आहे. ते शाळांचे स्वतःचे मैदान आहे. काही ठिकाणी ज्या खूप लहान शाळा असतात तिथे मुलांची संख्या कमी असते किंवा अगदी जवळ ग्रामपंचायतीची जागा असते. उरलेल्या ७७ शाळांमध्ये जवळच्या ग्रामपंचायतीच्या जागेवर मैदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. अशी अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला माहिती विशद केली. संरक्षक भिंतीच्या संदर्भात माहिती द्या. असा समितीने प्रश्न विचारला असता त्यासंदर्भात अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी संरक्षक भिंतीबाबत आमच्याकडे डेटा उपलब्ध आहे. त्यामध्ये विविध प्रकारच्या संरक्षक भिंतीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. उदाहरणार्थ काही ठिकाणी पक्की भिंत, काही ठिकाणी तारेची कुंपण, आहेत. जळगाव जिल्ह्यातील पूर्ण १८४७ शाळांपैकी जिथे काहीच संरक्षक भिंती नाहीत अशी २१९ ठिकाण आहेत. ग्रामविकास विभागाला आपण असे म्हटले आहे की, तुमच्याकडे जो १४ व्या वित्त आयोगाचा निधी आहे त्यातून त्यांनी बांधकाम करावे. अशी माहिती समितीस विशद केली. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या जेवढया ग्रामपंचायती आहेत त्यांच्याकडे ऑपरेटरचा पेमेंट देण्यासाठी पैसे नाहीत अशी अवस्था आहे. यावर १४ व्या वित्त आयोगामध्ये आपण फक्तइनेबल केलेले आहे. १४ व्या वित्त आयोगाच्या पैशातून ते करता येते पण शालेय शिक्षण विभागाकडे जे पैसे आहेत त्यातून ते बांधकाम पूर्ण करतील. असे सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विशद केले.

समितीने विचारणा केली की, हे बांधकाम करता येत असेल पण सचिवांनी सांगितल्याप्रमाणे आर्थिक तरतूद एवढी नाममात्र असेल तर १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीऐवजी शिक्षण विभागाकडून जर त्यांना काही निधी प्राप्त झाला म्हणजे १४ व्या वित्त आयोग किंवा डीपीडीसी असे दर्शवून दिले तर दुसरा विषयच येत नाही. कारण पालकमंत्री डीपीडीसीतून पैसे देत नाहीत आणि १४ व्या वित्त आयोगातून देखील शाळेला १ रुपया सुद्धा मिळत नाही. आधी जिल्हा परिषद मार्फत प्रत्यक्षपणे शाळेला ४ टक्के पैसे जात असत पण आता ते जात नाहीत. आता कमिशनर मार्फतच पैसे खर्च होतात. असे समितीने संबंधितांना निदर्शनात आणून दिले असता, त्यासंदर्भात अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी माहिती दिली की, शालेय शिक्षण विभागाचे बजेट कमी असल्यामुळे आता आपण काही बाबीसाठी निधी देत नाही. दरवर्षी बजेट उपलब्ध होण्यासाठी आम्ही जास्तीत जास्त प्रयत्न करतो.

समितीने विचारणा केली की, वेगवेगळया माध्यमातून शाळेला सर्व साहित्य उपलब्ध करून दिले जातात. अशा प्रकारच्या सुविधा नसलेल्या काही शाळा दुर्गम भागात असतील किंवा काही शाळा जंगलव्याप्त भागात असतील त्या ठिकाणी जर संरक्षण भिंती नसतील तर ४ टक्के सादील भार हा शाळेचा हक्काचा पैसा आहे, तो तुम्ही तुमच्या पातळीवर खर्च करण्यापेक्षा जिल्हा परिषदेमार्फत खालच्या स्तरावर खर्च करा. पूर्वी याप्रमाणेच खर्च होत होता. नंतर खरेदीचा व्याप वाढला, शासनाच्या पातळीवर खरेदी करून जिल्हा परिषदेला पैसा दिला जायचा आणि जिल्हा परिषदेमधून बिले काढली जायची, ही चुकीची पद्धत आणली आहे. तुमच्या शाळेला ज्या भौतिक सुविधेची अतिआवश्यकता आहे त्या ठिकाणी आपण खर्च करावा. अशी विचारणा समितीने केली असता त्याबाबत अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी आपण म्हणत आहात ते मान्य आहे. माझ्या माहितीप्रमाणे ही खरेदी काही वर्षापासून बंद करण्यात आलेली आहे. आता फक्तपाठ्यपुस्तक आणि गणवेश एवढयाच वस्तु आपण खरेदी करतो. अशी त्यांनी समितीला माहिती विशद केली. यासंदर्भात समितीने पुढे अशी विचारणा केली की, गणवेश सुद्धा खरेदी केले जात नाही. त्याचे पैसे डीबीटीमध्ये टाकण्यात येतात. यासंदर्भात अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी माहिती दिली की, खरेदी करायची असेल तर शालेय व्यवस्थापन समितीमार्फत केली जाते. सर्व शिक्षा अभियानामध्ये जेवढा निधी आवश्यक आहे तो मिळत नाही. कारण केंद्र शासनाकडून मिळणारा निधी काही वर्षांसून कमी मिळत आहे म्हणून ज्या अत्यावश्यक योजना आहेत त्यासाठी सुद्धा निधी कमी पडत आहे, यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत यावर्षी सुद्धा आम्ही निधीची मागणी करणार आहोत. अशी माहिती समितीस अवगत केली.

शाळेच्या वीज पुरवठ्याची तरतूद कोणाकडे येते, जिल्हा परिषदांच्या प्रत्येक शाळेचे लाईट बिल कमर्शियल केलेले आहे. त्यामुळे एवढी थकबाकी दिसते की, ते वीज पुरवठा कपात करायला येतात आणि आपल्याकडे त्याचा ताबा दिसतो. एमएसईबीचे कर्मचारी वसूल करण्यासाठी येतात. ते लाईट बिल व्यापारी दरप्रमाणे लावलेले आहे त्या शाळेमध्ये कोणता कमर्शियल वापर आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, संचालक, महावितरण मंडळ यांनी, खुलासा केला की, ते लाईट बिल व्यापारी दराप्रमाणे नाही सार्वजनिक सेवा श्रेणी-१ हा दर शाळांना लागलेला आहे. सन २००९ ते सन २०१२ पर्यंत व्यापारी दराप्रमाणे आकारण्यात आला होता. सन २०१२ नंतर सार्वजनिक सेवा म्हणून एमईआरसीने एक वेगळा प्रवर्ग निर्माण करण्यात आला. या प्रवर्गामध्ये हे देयक मोडते. १०० युनिटपेक्षा जर जास्त वीज वापरली तर सर्वात स्वस्त घरगुती प्रवर्गा पेक्षा कमी दर पडतो. १०० युनिटपेक्षा कमी जर वीज वापरली जात असेल तर ४ रुपये २५ पैसे एवढा प्रत्येक युनिटला दर पडतो. थोडक्यात सार्वजनिक सेवा प्रवर्ग-१ (पब्लिक सर्व्हिस कॅटॅगिरी) मध्ये सर्वात कमी घरगुती दर पडतो त्यामध्ये व्यापारी दराप्रमाणे दर नाही. सन २०१२ पासून हे दर बदलले आहेत. काही ठिकाणी असे घडले असेल तर निश्चित दुरुस्ती करू अशी माहिती देऊन समितीला आश्वासित केले. पुढे समितीने विचारणा केली की, महाराष्ट्रामध्ये जळगांव सहित सर्व शाळांमध्ये केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून द्यावा. आज आपण

संरक्षक भिंतीचा विचार करीत आहोत. पण आज शाळांच्या दुरुस्तीची सुद्धा खूप वाईट अवस्था आहे. ५० वर्षापूर्वी बांधलेल्या शाळा आहेत, त्यांना वर कवले नाहीत, पाऊस पडल्यावर त्या शाळांमध्ये पाणी येते. आमच्या भागात कवले काढून पत्रा लावला जातो. आपण विदर्भात पाहिले की, सर्व शिक्षा अभियानांतर्गत नवीन षटकोनी इमारती झाल्या आहेत. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी माहिती दिली की, सर्व शिक्षा अभियानामध्ये आपल्याकडे सध्या खोल्या कमी पडतात. त्या कौलारु खोल्या आहेत. जिल्हा नियोजन समितीकडून पैसे घेऊन शाळा दुरुस्ती करीत आहोत. यावर नवीन वर्गखोल्यांसाठी जिल्हा नियोजन समितीमध्ये लेखाशिर्ष देता येते, त्यासाठी यांनी मागणी केली पाहिजे. असे निदेश समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी नवीन वर्गखोल्यांसाठी ५० लाख रुपये मिळाले आहेत, असे समितीस विशद केले. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मागच्या कालखंडामध्ये देशाचे माननीय पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी असताना देशात सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोठ्या प्रमाणात वर्गखोल्या झालेल्या आहेत. परंतु महाराष्ट्रात ब-याच ठिकाणी जुन्या इमारती राहिलेल्या होत्या. आज त्याला खूप विलंब झालेला आहे त्यामुळे त्याखोल्याही कुचकामी झालेल्या आहेत. सचिव या नात्याने केंद्र शासनाकडे आपण त्याची मागणी करावी. राज्यामध्ये किती वर्ग खोल्या राहिलेल्या आहेत, त्यासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून पैसे उपलब्ध झाले पाहिजे. त्यासोबतच शाळेला संरक्षक भिंती समांतर झाल्या पाहिजे. जळगांवसहीत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अशा वर्गखोल्या झाल्या पाहिजे, असे समितीने निदेश दिले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर,२०१७ या कालावधीत जळगांव जिल्हा परिषदेस भेट दिली असता भेटीच्या वेळी जिल्ह्यातील पदाधिका-यासमवेत अनौपचारिक चर्चा करीत असताना समितीच्या असे निदर्शनास आले की, जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना भौतिक सोयी-सुविधा मिळणे आवश्यक आहे प्रत्येक शाळेमध्ये खेळाचे मैदान, संरक्षण भिंती आवश्यक आहेत, तसेच दलित वस्त्यांमध्ये पेवर ब्लॉक व सौर उर्जेवर चालणारी जल शुद्धीकरण यंत्रणा बसविण्याची आवश्यकता आहे. अनेक शाळांच्या परिसरामध्ये अतिक्रमणे झालेली आहेत. सदर अतिक्रमणे निष्कासित करण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्यास शाळेची अधिक आक्रसलेली मैदाने मोकळी होऊन त्याचा फायदा विद्यार्थ्यांच्या शारिरीक शिक्षणास होण्यास मदत होईल व परिणामी विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी राहील. तसेच शालेय पोषण आहाराचा पुरवठा निकृष्ठ दर्जाचा होत असल्याचे राज्यातील बहुतांश शाळामध्ये आढळून आलेले आहे. सदर ठिकाणी निकृष्ठ दर्जाचा पुरवठा करण्यात येत असतानादेखील पुरवठा केलेला माल चांगल्या दर्जाचा असल्याचे प्रमाणपत्र दिले जाते, याप्रकरणी समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

उपरोक्तप्रकरणी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट,२०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली त्यामध्ये असे आढळून आले की, **जळगांव जिल्ह्यामध्ये एकूण १९२३ शाळांपैकी अद्याप ७७ शाळांमध्ये खेळाचे मैदान उपलब्ध नाही. जळगांव जिल्ह्यातील १८४७ शाळांपैकी २१९ शाळांना संरक्षण भिंती नाहीत. तसेच शाळांना पुरविण्यात येणारे गणवेष खरेदी न करता गणवेषाची रक्कम प्रत्यक्ष लाभ हस्तांतरणाद्वारे (Direct Benificiary Transfer) त्यांच्या खात्या (डेबीट) मध्ये टाकण्यात येते. राज्यात बहुतांश ठिकाणी शाळा इमारती जुन्या झालेल्या असल्यामुळे शाळा खोल्या निकृष्ठ आहेत, त्यामुळे सर्व शिक्षा अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून निधी प्राप्त करून घेण्यात यावा. प्रत्येक शाळांना समांतर संरक्षण भिंती बांधण्यात याव्यात. उपरोक्तप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा सर्वंकष अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, जळगांव ( प्रशासन )

### आरोग्य, कृषी, पाणीपुरवठा व पशुसंवर्धन विभागासाठी तरतूद असतानाही निधी खर्च न करणेबाबत ( पंचायत समिती, जामनेर )

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत जळगांव जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-१३ या वर्षाचे एकूण उत्पन्न रु. २६,३३,७१६ असून प्रत्यक्ष खर्च रु. ५५,६६० आहे. तरतूद ११.३५ लाख रुपये असताना २६ लाख रुपयांचा ताळमेळ दिसून येत नाही, याचे स्पष्टीकरण काय आहे, यावर गट विकास अधिकारी जामनेर, यांनी समितीस पुढील प्रमाणे खुलासा केला की, जामनेर पंचायत समितीचे सन २०१२-१३ मध्ये बाबनिहाय उत्पन्न दर्शविले आहे. त्यात आरंभिची शिल्लक दिनांक १.४.२०१२ रोजी रु. ६,३६,५६१ इतकी होती. सभागृहाचे भाडे रु. ३,०५,८३८ इतके मिळाले. उपकर अनुदान रु. १६,९१,३१७ हे ३१ मार्च रोजी प्राप्त झाल्याने ती रक्कम अखर्चित राहिली. पुढे समितीने विचारणा केली की, रक्कम जास्त असताना तरतूद कमी करण्याची कारणे काय आहेत, तुमच्याकडे ११ लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम होती की नाही? यावर गट विकास अधिकारी, यांनी नाही असे उत्तर देत विदित केले की, रु. ९.४५ लाख शिल्लक होते. सभागृहाचे भाडे आणि आरंभिची शिल्लक होती ती गृहित धरुन तरतूद केली होती. यावर समितीने अशी विचारणा केली की, रु. ९.४५ लाख शिल्लक होते तर ११ लाख रुपयांची तरतूद कशी केली, यावर गट विकास अधिकारी, यांनी माहिती दिली की, अपेक्षित उत्पन्न मिळेल असे गृहित धरुन तरतूद केली होती. समितीने विचारणा केली की, तरतूद करूनही प्रत्यक्ष खर्च फक्त ४.५५ लाख रुपये केला आहे. कृषी, पशुसंवर्धन, समाजकल्याण विभागावरील प्रत्यक्ष खर्च निरंक आहे. यावर गट विकास अधिकारी, यांनी विदित केले की, मागासवर्गीय व्यक्तींना शिवणयंत्र देण्यासाठी १ लाख रुपयांची तरतूद केली होती. परंतु पुरवठादाराने वेळेवर पुरवठा न केल्यामुळे त्या वर्षात ती रक्कम खर्च झाली नाही. ती रक्कम पुढील वर्षी खर्च केली आहे. यावर समितीने विचारणा केली की, आरोग्य, पाणीटंचाई याकरिता तरतूद का केली नाही, यावर सहाय्यक लेखा अधिकारी पंचायत समिती जामनेर यांनी असा खुलासा केला की, ३१ मार्च रोजी रु. ९ लाख शिल्लक होते. त्यावर आधारित बजेट तयार केले व डिसेंबर महिन्यात सुधारित बजेट तयार केले. पुढे समितीने अशी विचारणा केली की, ३१ मार्च रोजी रु. १६.९१ एवढी रक्कम प्राप्त झालेली असताना आरोग्य, कृषी, पाणीटंचाई, पशुसंवर्धन विभागासाठी तरतूद न करण्याची कारणे काय आहेत, प्रत्येक ठिकाणी बजेटची समस्या दिसून येते. तसेच ज्या विभागांसाठी तरतूद केली नाही, त्याकरिता लाभार्थी नव्हते का, यावर गट विकास अधिकारी, यांनी माहिती दिली की, समाजकल्याणसाठी लाभार्थी होते, परंतु ती योजना पुढील आर्थिक वर्षात राबविली आहे. पुरवठादाराने शिवणयंत्राचा वेळेवर पुरवठा केलेला नव्हता.

समितीने विचारणा केली की, पुरवठादाराने उशिरा साहित्य पुरवण्याची कारणे काय होती, एका पुरवठादाराने वेळेवर पुरवठा केला नाही तर दुसरा पुरवठादार का निवडला नाही, त्या आर्थिक वर्षात लाभार्थ्यांना वंचित का ठेवले, तालुक्यामध्ये पाणीटंचाई नव्हती का, यावर तालुक्यात पाणी टंचाई आहे. असे गट विकास अधिकारी, यांनी सांगितले. पुढे समितीने अशी विचारणा केली की, पाणी टंचाई हा जिव्हाळ्याचा विषय असताना नियोजन कसे करता? महाराष्ट्र हे कल्याणकारी राज्य आहे. तालुक्यातील जनतेला विविध योजनांच्या माध्यमातून लाभ देणे हे आपले कर्तव्य आहे. समाजातील शेवटच्या घटकाची आर्थिक उन्नती झाली पाहिजे. सरकारकडून जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांना करोडो रुपयांचा निधी देऊनही शेवटच्या घटकेला लाभ मिळत नसेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी ज्यांनी तरतूद केली नाही त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी आणि त्याचा अहवाल समितीला सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी होय, असे उत्तर देत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, समितीने दिलेल्या सूचनेनुसार मी चौकशी करतो. यावर्षी बजेट करण्यापूर्वी मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मिळून जिल्हा परिषदेचे बजेट करतो तसे पंचायत समितीचे बजेट सर्व निधी खर्च होण्याच्या दृष्टीने तयार करण्यासाठी विशेष सूचना देतो. यावर समितीने आपले मत व्यक्तकरत सांगितले केली की, समितीला सुद्धा याबाबत सरकारला शिफारस करावी लागेल. बजेटमध्ये प्रचंड तफावत दिसून येते. केलेली तरतूद त्या आर्थिक वर्षात खर्च होत नाही. योग्यप्रकारे बजेट तयार केले जात नाही. अनिवार्य खर्च आहे, त्या लेखाशिर्षावरील निधी खर्च होत नाही. केंद्रीय योजना राबविण्यामध्ये सुद्धा विलंब होतो. या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिका-यांनी १५ दिवसात आढावा घेऊन भविष्यात हे मुद्दे कसे टाळता येतील याची दक्षता घ्यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी,यांनी समितीस होकारात्मक उत्तर दिले.

**उपरोक्तमाहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

दिनांक ३१ मार्च, रोजी रुपये १६.९१ लक्ष इतकी रक्कम प्राप्त झालेली असतांना आरोग्य, कृषी, पाणी टंचाई, पशुसंवर्धन विभागासाठी तरतूद न करण्याची कारणे काय आहेत.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समितीस रक्कम रुपये १६.९१ लक्ष मात्र ३१ मार्च, २०१३ म्हणजेच वर्ष अखेरीस प्राप्त झालेने ती रक्कम अखर्चित राहीली. पंचायत समितीने आरंभीची शिल्लक आणि अनुदान गृहीत धरून अंदाजपत्रक तयार केले होते. सदर अंदाजपत्रकास आवश्यक असणारी तरतूद २० टक्के समाजकल्याण व १० टक्के महिला व बालकल्याण विभागासाठी पंचायत समिती मासिक सभा दिनांक २१-१२-२०१२ मध्ये चर्चा होऊन अंदाजपत्रकास मान्यता घेण्यात आली आहे. वरील बाबी वगळता सभागृहाने मान्यता दिल्याप्रमाणे ०४ बांधकाम, १७ सामुहिक विकास व २० संकिर्ण या लेखाशिर्षातंर्गत तरतूद करून खर्च करण्यात आलेला आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती जामनेर दिनांक ३१ मार्च रोजी रु. १६.९१ लक्ष इतकी रक्कम प्राप्त झालेली असतांना आरोग्य, कृषी, पाणीटंचाई, पशुसंवर्धन विभागासाठी तरतूद न करण्याची कारणे काय आहेत, तसेच अंदाज पत्रकामध्ये अनेक त्रुटी आढळून आलेल्या आहेत. जो १० टक्के निधी खर्च करणे अपेक्षित होता तो निधी खर्च का करण्यात आलेला नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीला विशद केले की, सदर अंदाजपत्रक दिनांक ३१ डिसेंबर रोजी तयार करण्यात आले होते. शासनाकडून अंदाजित किती रक्कम येईल त्याअनुषंगाने त्यांनी ठराव मंजूर केला होता. त्याप्रमाणे सदर निधी पुढील वर्षी खर्च करण्याचे त्यांनी नियोजन केले होते. जेवढा निधी प्राप्त होता तेवढा निधी त्यांनी खर्च केलेला आहे. १६.९१ लक्ष इतका निधी हा दिनांक ३१ मार्च रोजी प्राप्त झाल्यामुळे त्या आर्थिक वर्षामध्ये तो खर्च करता आला नाही. पण पुढील वर्षी तो निधी खर्च करण्यात आलेला आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत जळगांव जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाची वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान पंचायत समिती, जामनेर संदर्भात असे निदर्शनास आले की, सन २०१२-१३ या वर्षाचे एकूण उत्पन्न रुपये २६,३३,७१३ असून प्रत्यक्ष खर्च रुपये ५५,६६० आहे. यासाठी ११.३५ लाख रुपये तरतूद असताना २६ लाख रूपयांचा ताळमेळ दिसून आला नाही दिनांक ३१ मार्च, २०१३ अखेर रुपये १६ लक्ष ९१ हजार एवढी रक्कम पंचायत समिती जामनेर यांना प्राप्त झालेली असताना आरोग्य, कृषी, पाणीपुरवठा, पशुसंवर्धन विभागासाठी तरतूद करण्यात आली नाही. तालुक्यामध्ये पाणी टंचाई सारखी गंभीर समस्या असून देखील नियोजन करण्यात आले नाही त्यामुळे याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

महाराष्ट्र हे कल्याणकारी राज्य आहे तालुक्यातील जनतेला विविध योजनांच्या माध्यमातून लाभ देणे हे पंचायत समितीचे कर्तव्य आहे. समाजातील शेवटच्या घटकाची आर्थिक उन्नती झाली पाहिजे. शासनाकडून जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांना कोट्यावधी रूपयांचा निधी वितरीत केला जात असतानाही शेवटच्या घटकाला लाभ मिळत नसेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी पंचायत समितीसाठी ज्यांनी निधीची तरतूद केली आहे त्यांची चौकशी करून चौकशीनुसार त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्याच्या आत समितीस पाठविण्यात यावा.

**तसेच यापुढे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांतर्फे तयार करण्यात येणा-या वार्षिक विवरणपत्रामध्ये तरतूद करण्यात येऊन देखील नियोजनाअभावी लेखाशिर्षावरील निधी त्या आर्थिक वर्षात खर्च न झाल्यामुळे केंद्रीय योजना राबविण्यामध्ये विलंब होत आहे. त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आढावा घेऊन भविष्यात असे मुद्दे टाळता येतील याची योग्य ती दक्षता घ्यावी व त्या दृष्टीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, जळगांव (प्रशासन)

### जिल्हा परिषदेने समाजकल्याण विभासाठी २०% व महिला बालकल्याण विभागासाठी १०% तरतूद असणारा निधी खर्च न करणेबाबत (पंचायत समिती बोदवड)

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर,२०१७ या कालावधीत जळगांव जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-१३ चे उत्पन्न रु. १३,७४,१३६ एवढे कमी असण्याची कारणे काय आहेत, यावर प्रभारी गटविकास अधिकारी बोदवड यांनी माहिती दिली की, सन २०१२-१३ चे बाबनिहाय उत्पन्न रु. १२,८९,२९७ आहे. ही नवीन पंचायत समिती स्थापन झालेली आहे. या तालुक्यामध्ये उत्पन्नाचे स्त्रोत फार कमी आहेत. या परिसरात औद्योगिक क्षेत्र नाही. गौण खनिज उत्पन्नाचे साधन नाही. यावर समितीने विचारणा केली की, रु. १३.७४ लाख एकूण उत्पन्न असताना २.४० लाख खर्च करून ११ लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम अखर्चित का ठेवण्यात आली, प्रभारी गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सामान्य प्रशासन विभाग या शिर्षाखाली १.३३ लाख रुपये कोणत्या बाबीवर खर्च केले, यावर मार्च मध्ये रक्कम प्राप्त झाल्यामुळे त्याच वर्षी रक्कम खर्च होत नाही. रु.१,३३,७४४ हा खर्च पंचायत समितीची दोन वाहने आहेत त्या वाहनावर देखभालीपोटी झालेला आहे. हा खर्च रु.१.३३ लाख नसून रु.१,३०,७४४ इतका आहे. एकूण २,३७,५६० एवढा खर्च झालेला आहे. पुढे समितीने अशी विचारणा केली की, रु. १,३३,७४४ एवढा खर्च दर्शविला आहे. इतर योजनांवर खर्च का केला नाही, इतर पंचायत समितीमध्ये वाहन वापरले जात नाही का, इतर पंचायत समितीमध्ये हा प्रश्न उपस्थित झाला नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला पुढील प्रमाणे माहिती दिली की, अनुदान आणि होणारा खर्च पंचायत समितीनिहाय समाजकल्याणसाठी रु. ७०,००० तरतूद केली, ती २० टक्के रक्कम होत नाही. महिला बालकल्याणसाठी रु. ३५,९९९ एवढी तरतूद केली ती १० टक्के होत नाही.

जिल्हा परिषद समाजकल्याण विभागासाठी २० टक्के व महिला बालकल्याण विभागासाठी १० टक्के तरतूद केली जात नाही तोपर्यंत बजेटला मान्यता दिली जात नाही. उत्पन्नाचा विचार करता तरतूद योग्य असल्याचे दिसून येत नाही. निधी उपलब्ध असतानाही खर्च केलेला नाही. या संदर्भात चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा. हा विषय समितीने विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी घेतला आहे. असे समितीने मत व्यक्त करीत विचारले की, सामान्य प्रशासन विभाग, समाजकल्याण व महिला बालकल्याण विभाग वगळता इतर विभागांसाठी तरतूद करण्याची आवश्यकता नव्हती का, प्रत्येक पंचायत समिती मध्ये खर्च करण्याची पद्धत वेगवेगळी दिसून येते. प्राधान्यक्रम वेगळे आहेत. उपेक्षित, वंचित घटकांनुसार प्राधान्यक्रम ठरविला पाहिजे. वाहन देखभालीवर १.३३ लाख रुपये खर्च केला आहे. आरोग्य, कृषी, पाणीपुरवठा यासाठी एक रुपयाही तरतूद केलेली नाही. जी तरतूद केली ती नियमानुकूल नाही. समाजकल्याण व महिला बालकल्याण विभागासाठी तरतूद केल्याशिवाय बजेट मंजूर होत नाही. असे समितीने संबंधितांना निदेश देत विचारले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, ती तरतूद करणे बंधनकारक आहे. पुढे यासंदर्भात प्रभारी गटविकास अधिकारी यांनी समितीला विदित केले की, त्या वर्षात रक्कम खर्च झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. यासंदर्भात समितीने संबंधितांना पुढील प्रमाणे निदेश दिले की, त्या कालावधीत ही रक्कम खर्च होणे अनिवार्य होते. समितीने सामान्य प्रशासन विभागाबद्दल जी चर्चा केली तो विषय भुसावळ व जामनेर पंचायत समितीमध्ये उपस्थित झाला नाही. शासनाच्या विविध योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम आपले आहे. कृषी, पाणी पुरवठा, आरोग्य विभागासाठी तरतूद केली नाही. निधी अखर्चित ठेवला ही अनियमितता आहे. या संदर्भात चौकशी जे दोषी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई केली पाहिजे. हा विषय साक्षीसाठी घेण्यात येणार आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पंचायत समिती बोदवड :-** जिल्हा परिषद समाजकल्याण विभागासाठी २० टक्के व महिला व बालकल्याण विभागासाठी १० टक्के तरतूद केल्याचे न दिसून येणे, निधी उपलब्ध असतानाही खर्च न करणे यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित जबाबदार अधिका-याविरूद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती बोदवड वाढीव उपकर चे २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रक ७,००,००० रुपये करण्यात आले होते. त्यानुसार समाजकल्याण विभागासाठी १,६०,००० रूपयांची तर महिला व बालकल्याण विभागासाठी ७५,००० रूपयांची तरतूद करण्यात आली होती, ती अनुक्रमे २०% व १०% पेक्षा जास्त आहे.

सुरूवातीची शिल्लक ८४,८३९ रुपये व २०१२-१३ या आर्थिक वर्षात प्राप्त १२,८९,२९७ रुपये असे एकूण १३,७४,१३६ रुपये जरी पंचायत समिती उत्पन्न असले तरी पंचायत समितीला ३० मार्च, २०१३ पर्यंत सुरूवातीच्या शिल्लकेसह केवळ २,५९,८३१ रुपये प्राप्त होते. प्राप्त रक्कमेनुसार समाजकल्याण विभागावर ७०,८१७ रुपये तर महिला व बालकल्याण विभागावर ३५,९९९ रुपये खर्च करण्यात आला होता. सन २०१२-१३ च्या एकूण १३,७४,१३६ रूपयांपैकी उर्वरीत ११,१४,३०५ रुपये ही रक्कम ३१ मार्च, २०१३ ला प्राप्त झाल्यामुळे खर्च करण्यात आला नाही. मात्र उर्वरित रक्कम पुढील आर्थिक वर्षात अनुशेषासह खर्च करण्याची तरतूद करण्यात आली आहे. वरील स्थिती पाहता २०% व १०% ची सुधारीत अंदाजपत्रकात जरी तरतूद केली असली तरी प्रत्यक्ष प्राप्त निधीनुसार खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधितावर कार्यवाही करण्यात आली नाही. तरी कृपया अनुपालन स्वीकृत होण्यास विनंती.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय- (** वित्त-३ ) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगाव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी घेतलेल्या साक्षी दरम्यान विभागीय सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, महिला व बालकल्याण विभागासाठी २० ऐवजी १० टक्के तरतूद केली होती. १० लाख रुपये मिळतील असे गृहित धरुन तरतूद केली होती. दिनांक ३० मार्चपर्यंत त्यांच्याकडे फक्त२ लाख रुपये आले होते. दिनांक ३१ मार्चला निधी आल्यामुळे पुढील वर्षी खर्च केला आहे. यावर सचिवानी दिलेल्या माहितीबाबत समितीने संमती दर्शविली.

### अभिप्राय व शिफारशी

जळगांव जिल्हा परिषदे अंतर्गत पंचायत समिती बोदवड येथे पंचायती राज समितीने भेट दिली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१२-१३ या प्रशासन अहवालासंदर्भात प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार बोदवड पंचायत समितीचे सन २०१२-१३ चे उत्पन्न रुपये १३,७४,१३६ एवढे उत्पन्न होते. तसेच पंचायत समिती बोदवड वाढीव उपकरचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रक रुपये ७,००,००० करण्यात आले होते. त्यानुसार समाजकल्याण विभागासाठी रुपये १,६०,००० तर महिला व बालकल्याण विभागासाठी ७५,००० रूपयांची तरतूद करण्यात आली होती, ती अनुक्रमे २०% व १०% पेक्षा जास्त होती तथापि, प्राप्त रकमेनुसार समाजकल्याण विभागावर रुपये ७०,८१७ तर महिला व बालकल्याण विभागावर रुपये ३५,९९९ एवढी रक्कम खर्च करण्यात आली होती. त्यामुळे समाजकल्याण विभाग व महिला व बालकल्याण विभागावर अनुक्रमे २०% व १०% पेक्षा जास्त तरतूद करून देखील त्याप्रमाणात रक्कम खर्च केल्याचे दिसून येत नाही.

यासंदर्भात सचिवांसमवेत झालेल्या साक्षीदरम्यान असे समितीस विदीत करण्यात आले की, **महिला व बालकल्याण विभागासाठी २० ऐवजी १० टक्के तरतूद केली होती १० लाख रुपये मिळतील असे गृहित धरून तरतूद केली होती. दिनांक ३० मार्च, २०१३ पर्यंत पंचायत समिती बोदवड यांच्याकडे फक्त २ लाख रुपये आले होते. दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी निधी प्राप्त झाल्यामुळे तो पुढील वर्षी खर्च करण्यात आला, असे असले तरी पंचायत समिती बोदवड यांच्या उत्पन्नाचा विचार करता योग्य प्रकारे नियोजन करण्यात आल्याचे दिसून येत नाही. तसेच आरोग्य, कृषी, पाणीपुरवठा या विभागासाठी एक रुपयाचीही तरतूद केलेली नाही ही बाब नियमानुकुल नाही. यासंदर्भात चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, जळगांव ( प्रशासन )

### अंगणवाडी सेविका/मदतनीस यांची रिक्तपदे भरण्याबाबत ( पंचायत समिती, यावल )

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत जळगांव जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, आपण येथे ४० दिवस शालेय पोषण आहार दिला आहे, असे लिहिले आहे. मात्र आपण नेमके किती दिवस शालेय पोषण आहार दिला आहे, यावर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ३०० दिवसच शालेय पोषण आहार दिला आहे. दिवाळी व उन्हाळी सुट्टी असे ३० दिवस जातात, ५२ रविवार जातात. आपण मदतनीस ८ दिवस व सेविका ८ दिवस ठेवतो. यावर समितीने विचारणा केली की, सुटया असो किंवा नसो आपल्याला ३०० दिवस शालेय पोषण आहार देण्याचे उद्दिष्ट आहे. यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी होय असे उत्तर दिले. पुढे समितीने विचारणा केली की, स्तनदा माता किती आहेत, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी माहिती दिली की, १४४७ स्तनदा माता आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, गंभीर रुग्ण किती आहेत, यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी माहिती विशद केली की, गंभीर रुग्ण एकही नाही. सॅम-मॅमचे ९८ बालके आहेत. व्हीसीडीसी सुरू केले आहे. पुढे समितीने अशी विचारणा केली की, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची सर्व पदे भरली आहेत का? यावर विस्तार अधिकारी शिक्षण विभाग यांनी माहिती विशद केली की, ५ पदे रिक्तआहेत, ती भरण्याची कार्यवाही सुरू आहे. दहावी उत्तीर्ण कॅटेगरीचे उमेदवार मिळत नाहीत. रिक्तपदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. जाहिरात दिली जाते, ग्रामपंचायतीमध्ये सांगितले जाते, दवंडी दिली जाते, ग्रामपंचायत सदस्यांना सांगितले जाते. या संदर्भात पुढे समितीने अशी विचारणा केली की, आपण आजूबाजूच्या गावात सुद्धा या संदर्भात सांगावे. यावर विस्तार अधिकारी शिक्षण विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयानुसार उमेदवार स्थानिक व्यक्ती असली पाहिजे. तीन वेळा जाहिरात दिली आहे, मात्र उमेदवार मिळत नाहीत. यावर पुढे समितीने सुचना देत निदेशित केले की, दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयान्वये संबंधित गावातील अंगणवाडी सेविका व मदतनीस पदांसाठी त्याच गावातील दहावी उत्तीर्ण महिला असावी ही अट शिथिल करणे गरजेचे आहे. कारण यावल पंयायत समिती अंतर्गत गावांत ३ वेळा जाहिरात देऊनही महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे लंगडाआंबा, आंबापाणी, रुईखेडा, चारमळी, खालकोट या गावांना योजनेपासून वंचित रहावे लागत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. याबाबत पाठपुरावा करण्यात आला आहे. तरी सदर विषयाच्या संदर्भात उच्च स्तरावरुन निर्णय व्हावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती यावल अंतर्गत तीन वेळा जाहिरात देवूनही अंगणवाडी सेविका व मदतनीस पदांसाठी महिला उमेदवार उपलब्ध न झाल्याने लंगडाआंबा, आंबापाणी, रूईखेडा, चारमळी व खालकोट या गावांना योजनेपासून वंचित राहावे लागत आहे. याप्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती यावल अंतर्गत लंगडाआंबा, आंबापाणी, रूईखेडा, चारमळी व खालकोट येथील अंगणवाडी सेविका व मदतनीस पदांसाठी तीन वेळेस जाहीरात देवूनही पात्र महिला उमेदवार उपलब्ध न झाल्याने सदर ठिकाणी पदे रिक्त आहेत.

परंतु लंगडाआंबा येथील कार्यभार श्रीमती नसीम सुभान पिंजारी, उसमळी येथील सेविका, अंबापाणी येथील कार्यभार श्रीमती सुनिता संजय महाजन, मोहराळा येथील सेविका, रुईखेडा येथील कार्यभार श्रीमती हसीना रशिद तडवी, वाघझिरा येथील सेविका, चारमळी येथील कार्यभार श्रीमती सुनंदा दिपक तायडे, मारूळ येथील सेविका, आणि खालकोट येथील कार्यभार श्रीमती अशरफा उखर्डू तडवी, ईचखेडा येथील सेविका, यांचेकडे अतिरिक्तस्वरूपात सोपविण्यात आलेला आहे. तसेच त्यांच्यामार्फत योजना राबविण्यात येत आहेत. शासनाच्या योजनेपासून कोणतेही लाभार्थी वंचित नाहीत.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**महिला व बाल विकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद जळगांव यांचे अभिप्रायाशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, अंगणवाडी सेविका नसल्यामुळे बालके वंचित राहिली असा प्रश्न होता. अंगणवाडी सेविकांच्या पदासाठी जाहिरात देऊनही उमेदवार मिळाले नाहीत. म्हणून दुस-या व्यक्तींना चार्ज दिला होता. त्यामुळे कोणी लाभापासून वंचित राहिले नाही.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, जळगांव अंतर्गत पंचायत समिती, यावल येथे पंचायती राज समितीने भेट दिली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, यावल तालुक्यात एकूण १४४७ स्तनदामाता आहेत, अति-कुपोषित आणि कुपोषित (सॅम-मॅम) ९८ बालके आहेत. अंगणवाडी सेविका आणि मदतनीस ही पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. जाहिरात दिलेली आहे, ग्रामपंचायती मध्ये दवंडी दिली जाते, तथापि, इयत्ता दहावी उत्तीर्ण प्रवर्गाचे उमेदवार मिळत नाहीत. दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार उमेदवार ही स्थानिक व्यक्ती असली पाहीजे. या निर्णयान्वये संबंधित गावातील अंगणवाडी सेविका व मदतनीस पदांसाठी त्याच गावातील दहावी उत्तीर्ण महिला उमेदवार असावी ही अट शिथील करणे गरजेचे आहे. यावल पंचायत समिती अंतर्गत ३ वेळा जाहिरात देऊनही महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे लंगडा आंबा, आंबा पाणी, रुईखेडा, चारमळी, खालकोट या गावांना योजनेपासून वंचित रहावे लागत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे समिती तीव्र नापंसती व्यक्त करीत आहे.

**यावल पंचायत समिती प्रमाणे राज्यात इतर ठिकाणी अंगणवाडी सेविका व मदतनीसांची पदे वांरवार जाहिरात देऊन देखील उमेदवार उपलब्ध होत नाही. दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दहावी उत्तीर्ण महिला असावी ही अट शिथिल करण्याबाबत शासनाने त्वरित निर्णय घ्यावा व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, जळगांव ( प्रशासन )

## मौजे सुंदरनगर, ता. चाळीसगाव येथील गाव तळ्याची दुरुस्ती करणेसाठी प्रत्यक्ष अनुदान प्राप्त झाल्याखेरीज कार्यारंभ आदेश दिल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत जळगांव जिल्हा परिषदेस भेट दिली असता जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, २००८-२००९ आणि २०११-२०१२ या वर्षीचे अहवाल तपासले असता या दोन्ही अहवालांमध्ये वेगवेगळी माहिती आहे. मुद्दा क्रमांक १३१, १३२, १९३, १९४ यामध्ये तसेच यामध्ये १९२ ते १९४ मुद्दा आहे. यापैकी मौजे सुंदरनगर, ता. चाळीसगाव येथील गाव तळ्याची दुरुस्ती करणे, हा मुद्दा आहे. अनुदान प्रत्यक्ष उपलब्ध झाल्याखेरिज निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येऊ नये, अशी अट या कामामध्ये असतानाही कार्यारंभ आदेश देण्यात आले, हे खरे आहे काय, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, अधीक्षक अभियंता, नाशिक यांनी दिनांक ०९ डिसेंबर, २००९ रोजी तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यानंतर कामाचा कार्यादेश (वर्क ऑर्डर) दिनांक १९ डिसेंबर, २००९ रोजी दिलेला आहे. अधीक्षक अभियंता यांच्याकडून हा निधी उपलब्ध होईल, या भरवशावर कार्यादेश (वर्क ऑर्डर) देण्यात आली होती. यावर समितीने विचारणा केली की, अट क्र. ५ नुसार अनुदान प्रत्यक्ष उपलब्ध झाल्याखेरीज निविदा प्रक्रिया सुरू करू नये, अश्या यामध्ये स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. तसेच तशी अट देखील आहे. अशी अट असताना आपण कार्यारंभ आदेश दिले. ही बाब अतिशय चुकीची व गंभीर आहे. दिनांक ०२/१२/२००९ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. १९ डिसेंबर, २००९ रोजी कार्यारंभ आदेश दिलेला आहे. १८ दिवसामध्ये कार्यारंभ आदेश होतात काय, याचे उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी द्यावे. यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी समितीस विदित केले की, ठेकेदारासोबत करारनामा केलेला आहे. दिनांक ०२ डिसेंबर, २००९ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती आणि दिनांक १९ डिसेंबर, २००९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. सदरहू काम ६ लाख ६९ हजार रुपयांचे होते.

पुढे समितीने अशी विचारणा केली की, ६ लाख ६९ हजार रुपयांच्या कामाला तातडीची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती काय, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी असे उत्तर दिले की, त्यावेळी मजूर सोसायटीला शिफारशी देण्यात येत होत्या. पुढे समितीने विचारणा केली की, तरी देखील प्रशासकीय मान्यता दिनांक ०२ डिसेंबर, २००९ रोजी देण्यात आली. प्रशासकीय मान्यतेची प्रत कार्यालयातून बाहेर यायलाच दोन, तीन दिवस लागतात. तसेच आठवड्यातून शनिवार व रविवार दोन दिवस कार्यालय बंद असते. तसेच एखादी शासकीय सुट्टी देखील येते. तरी देखील तुम्ही १६ ते १७ दिवसामध्ये म्हणजेच दिनांक १९ डिसेंबर, २००९रोजी कार्यारंभ आदेश तातडीने दिले. निधी उपलब्ध नसताना कार्यारंभ आदेश कोणाच्या आदेशानुसार एवढया तातडीने देण्यात आला, यामध्ये जिल्हा परिषदेच्या अधिका-यांनी त्यांच्या विशेषाधिकाराचा वापर केला होता काय, या लेखाशिर्षावर निधी प्राप्त नसताना जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून या कामावर पैसे खर्च केले. तसेच करारनामा केलेला नसतानाही कार्यादेश (वर्क ऑर्डर) देखील देण्यात आली. अशा परिस्थितीमध्ये विशेषाधिकाराचा वापर केव्हा केला जातो, हे तुम्हाला माहीत आहे काय, एकदम निकडीची बाब असेल, एखादी आपत्तीजनक घटना घडली असेल, त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना देखील त्यांच्या अधिकारांचा वापर करता येत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम ५४/२ मध्ये केवळ जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना अधिकार आहेत. तुम्ही हे चुकीचे काम केलेले आहे. अशी समितीने नाराजी व्यक्त करून असेही संबंधितांना निदर्शनास आणून दिले की, सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ५२६, दिनांक ४ जून, २०११ च्या सर्वसाधारण सभेमध्ये देयक प्रदान केलेले आहे. काम पूर्ण झाल्यावर जवळपास १० महिन्यांनी स्वनिधीतून हा ठराव जिल्हा परिषदेने केला. त्यानंतर सदर कामाचे अनुदान शासनाकडून प्राप्त करण्यासाठीचा प्रस्ताव दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी म्हणजेच तब्बल ०४ वर्षांनी सादर केला. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीला माहिती दिली की, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी वर्क ऑर्डर दिली नसताना यांसदर्भातील लेखा संहितेनुसार तपासणी करणे आवश्यक दिसते.

यावर समितीने विचारणा केली की, निधी उपलब्ध नसताना कार्यारंभ आदेश देण्याचे काय कारण होते, याबाबतची केवळ तपासणी करून चालणार नाही. स्वनिधीतून दहा महिन्यांनी देयके (बिल) देण्याचा ठराव घेण्यात आला आणि त्याच कामावर खर्च झालेला निधी प्राप्त करण्यासाठी चार वर्षांनी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या निधीतून हा खर्च व्हावा, अशी शिफारस कोणी केली होती, यावर अतिरिक्तमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, या प्रकरणामध्ये कार्यादेश (वर्क ऑर्डर) देण्याची आवश्यकता नव्हती. यामध्ये अनियमीतता झालेली आहे. पुढे समितीने विचारणा केली की, या प्रकरणामध्ये सुरूवातीपासून संशय व्यक्त करण्यासारखी बाब आहे. ती बाब म्हणजे निधी उपलब्ध नसतानाही कार्यादेश (वर्क ऑर्डर) दिलेली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी माहिती दिली की, या प्रकरणामध्ये नियमाचा भंग झाल्याचे दिसत आहे. यामध्ये ५४/२ प्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसत नाही. पुढे समितीने विचारणा केली की, दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी म्हणजेच ०४ वर्षानंतर शासनाला निधी मागण्याची काय आवश्यकता होती, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती

दिली की, सेस फंडातून जो खर्च झाला, त्याच्यावर दरवर्षीच्या मागणी प्रमाणे पैसे आले नाही. यावर समितीने विचारणा केली की, आपण यावर कायदेशीर मत सांगावे. समितीच्या या प्रश्नाला दुजोरा देत संचालक, स्थनिक निधी लेखा यांनी माहिती दिली की, पैसे आल्याशिवाय खर्च करायला नको होता. जिल्हा परिषदेचा ठराव झालेला आहे. तथापि शासनाकडे मागणी केली पाहिजे होती. ठराव झाल्यानंतर तरी मागणी केली पाहिजे होती. यावर समितीने विचारणा केली की, काम पूर्ण झाल्यानंतर ४ वर्षांनी स्वःनिधीतून खर्च करण्याचा ठराव जिल्हा परिषद घेते, त्याची अंमलबजावणी होते, त्याला पैसे दिले जातात आणि नंतर लगेच शासनाकडे पुन्हा त्याच कारणासाठी निधी मागितला जातो, हे कसे काय होऊ शकते, हे फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे प्रकरण आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी या निधीला संमती कशी दिली, जिल्हा परिषदेचे आर्थिक सल्लागार म्हणून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची पोस्ट आहे. अकाऊंट कोडप्रमाणे जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारांची अंमलबजावणी होते की नाही, हे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पहायचे आहे. लेखा संहितेची अंमलबजावणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी करतात. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी माहिती दिली की, प्रस्तुत प्रकरणात विभागाने निर्णय घेतला. काम पूर्ण झाले, त्यावेळी कामाचे देयक अदा करण्यासाठी निधी उपलब्ध नव्हता, त्यामुळे विभागाने सादर केले की, आम्ही निधी उपलब्ध करून घेत आहोत, त्याला वेळ लागणार आहे, त्यामुळे तूर्त देयक सेसमधून देण्यासाठी परवानगी द्यावी. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेचे अधिकार आहेत, तुम्ही त्यांचे अधिकार पाहता. तुम्ही खाते प्रमुख आहात. खाते प्रमुखाला अधिकार आहेत का, जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प एकदा मंजूर झाल्यानंतर अर्थसंकल्पाला बदलविण्याचे अधिकार खाते प्रमुखाला आहेत का, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी माहिती दिली की, जिल्हा परिषदेच्या सेसमधून पेमेंट केले आहे, कारण निधी येण्यासाठी वेळ लागणार होता. पुढे समितीने विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांना अधिकार नाही. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नियंत्रण अधिकार आहेत. त्यांनी यासाठी संमती कशी दिली, जिल्हा परिषदेची त्या खर्चाला मंजुरी नसताना यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी माहिती दिली की, देयक अदा करण्यास अगोदर मंजुरी दिली नाही. विभागाने सादर केले की, कामासाठी निधी नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात इतक्या रकमेची तरतूद आहे, या लेखाशिर्षामधून हा खर्च भागविला जावा, अशी विषय समितीने शिफारस केली आहे का, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी माहिती दिली की, हा विषय समितीपुढे गेलेला नाही. पुढे समितीने विचारणा केली की, म्हणजे कामाला कार्योत्तर मंजुरी घेतली आहे. कलम ५४(४) चा वापर केल्यावर सर्वसाधारण सभेपुढे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना तो ठराव मंजूर करावा लागतो. कलम ५४(२) च्या आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मत नोंदवायचे आहे, त्यानंतर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आदेशित करतात. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे मत नोंदविले आहे का, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मत नोंदविल्यानंतर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी कलम ५२ चा वापर केला का, कलम ५४(२) चा वापर केल्यावर जनरल बॉडीपुढे हा विषय गेला का ? दिनांक २.१२.२००९ ला प्रशासकीय मान्यता दिली, दिनांक १९ डिसेंबर, २००९ ला कार्यारंभ आदेश दिला. दीड वर्षांनी जनरल बॉडीपुढे ठराव मंजूर करायचा, हे योग्य आहे का, यामध्ये कोणाकोणाचे हितसंबंध गुंतले आहेत, ते पाहणे गरजेचे आहे. एकदा जिल्हा परिषदेचा निधी खर्च झाल्यावर पुन्हा शासनाकडे मागणी करायची, हे बरोबर नाही. लेखा व कोषागारे काय करीत होते ? यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस असे विदित केले की, जिल्हा परिषदेच्या निधीतून रक्कम घेणे योग्य नव्हते. ज्या लेखाशिर्षा मधून कामे घेतली आहे, त्या लेखाशिर्षामधून त्यावर खर्च करणे आवश्यक होते. जिल्हा परिषदेच्या निधीतून काम करायचे असेल तर जिल्हा परिषदेच्या प्रक्रिये प्रमाणे मान्यता घेतली पाहिजे होती. मात्र सदर कामाला कार्योत्तर मंजुरी घेतल्याचे दिसत आहे. सदर कामामध्ये अनियमितता झाली आहे, हे स्पष्ट दिसत आहे. यावर समितीने विचारणा केली की, अनियमितता झाली आहे. शासनाकडे ४ वर्षांनंतर प्रस्ताव पाठविला आहे. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या अधिकाराचाच दुरुपयोग झाला आहे. जिल्हा परिषद, अध्यक्षांचा अधिकार कार्यकारी अभियंता व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांनी वापरला आहे.

उप सचिव ग्रामविकास विभाग यांनी माहिती दिली की, शासनाकडे मागणी केली होती. लेखाशिर्षाची रक्कम तात्पुरती भरण्यात आली असावी. शासनाकडून आल्यानंतर पुन्हा भरणा करून जिल्हा परिषदकडे ती रक्कम वर्ग करायची असेल, त्यामुळे त्यांनी मागणी केली असेल, त्या लेखाशिर्षावर रक्कम अपुरी असेल. यावर समितीने विचारणा केली की, त्या हेतुने त्यांनी तसे केले असावे, हे तुम्ही कसे सांगू शकता, शासनाकडे कदाचित चुकीच्या पद्धतीने गेले असेल. समितीच्या या प्रश्नावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी समितीला विदित केले की, ५२० क्रमांकाचा ठराव झाला, त्यामध्ये तसे नमूद होते की, शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यावर तो पुन्हा जिल्हा परिषदेच्या सेसमध्ये भरावा, म्हणून मागणी केली आहे. यावर पुढे समितीने असा प्रश्न विचारला केली की, चार वर्षांनंतर का मागणी केली ? लेखापरिक्षणात आक्षेप घेण्यात आला आहे. यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी सांगितले की, आम्ही उत्तर दिले होते की, असा ठराव झालेला आहे. मात्र कार्योत्तर मंजुरी घेतल्यानंतर आक्षेप घेण्यात आला आहे. या उत्तराच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, आक्षेप आल्यानंतर प्रस्ताव येतो. आक्षेप आला नसता तर तुम्ही शासनाकडे मागणी केली नसती. याचा अर्थ, आक्षेप कायम आहे. चार वर्षांनंतर अर्थ संकल्पीय आर्थिक तरतूद केली आहे का, ग्रामविकास विभागाने त्यांची बाजू घेऊ नये. अशी समितीने नाराजी व्यक्तकेली असता उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी माहिती दिली की, बाजू घेण्याचा काहीही विषय नाही. यावर समितीने विचारणा केली की, मग तुम्ही असे कसे म्हणत आहात की, चार वर्षांनंतर त्यांनी तसे केले असेल, मागणी केली असेल. सदर बाबतीत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगावे. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले

की, मी त्यावेळी नव्हतो. यावर समितीने संबंधितांना निदेश देत अधिका-यांनी व्यवस्थित उत्तर द्यावे. अधिका-यांकडून अपेक्षित उत्तरे दिली जात नाहीत. समिती येणार आहे, हे आपल्याला एक महिना पूर्वीपासून माहीत होते. आपण हे बुकलेट आमच्याकडे पाठविले पाहिजे होते. आमच्याकडे हे बुकलेट १५ दिवसांपूर्वी आले, त्यानंतर आम्ही ते वाचले, म्हणून प्रश्न विचारीत आहोत. परवाच्या दिवसापासून या प्रश्नांचा अभ्यास का केला नाही, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाप्रमाणे उत्तर आले पाहिजे, दोषी कोण आहे, या संदर्भात उत्तर अपेक्षित आहे. यावर अतिरिक्तमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, दिनांक ४.६.२०११ ला जिल्हा परिषदेचा ठराव झाल्यानंतर तत्कालीन अधिका-यांनी मागणी केली पाहिजे होती, ती केली नव्हती. हे निदर्शनास आल्यानंतर, ही मागणी सन २०१५ मध्ये केली आहे. पैसे आले नव्हते आणि मागणी देखील केली नव्हती. त्यामुळे नंतर मागणी केली आहे. आज अखेर पैसे आलेले नाहीत. यावर समितीने विचारणा केली की, पैसे आले नव्हते, तरतूद नव्हती, मात्र तरीही कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया केली. या सर्व बाबी कशाच्या आधारे केल्या, पैसे येणार आहेत, याची खात्री होती का, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला नाही असे सांगितले.

समितीने विचारणा केली की, २७०२-१४७९ चा पैसा येतो, त्याचे नियोजन करता. तो पैसा डीपीडीसीच्यामार्फत येतो. सन २००८ पासून डीपीडीसी अस्तित्वात आली. २७०२ चे पैसे डीपीडीसीमार्फत येतात. पहिल्यांदा आपण स्पिल वर्कवर खर्च केला पाहिजे होता. यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी माहिती दिली की, २७०२-१४७९ चा पैसा अधीक्षक अभियंत्यांकडे येतो. पुढे समितीने अशी विचारणा केली की, शासनाचा नियतव्यय आला होता का, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी माहिती दिली की, नाही असे उत्तर दिले. पुढे समितीने विचारणा केली की, मग तुम्ही कशाच्या आधारे निविदा केली, शासनाचा नियतव्यय नसताना निविदा केले आहे. तत्कालीन अधीक्षक अभियंत्यांना बोलाविले आहे का, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी माहिती दिली की, नाही असे उत्तर दिले.

समितीने विचारणा केली की, परवापासून बैठक सुरू आहे. आपण त्यांना का बोलाविले नाही, येथे अवैधानिक प्रक्रिया करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य एका बाबीवर बोलत आहेत, सन्माननीय सदस्य प्रश्न विचारीत आहेत, त्या पद्धतीने तुमच्याकडून उत्तरे येणे अपेक्षित आहे. आपण नेमके उत्तर का देत नाही, आपण सदर मुद्दा प्रलंबित ठेवू या. अधिका-यांनी या संदर्भात लेखी खुलासा सादर करावा. अशी समितीने नाराजी व्यक्त केली असता, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, अनियमितता झाली आहे, असे नाही. फक्त तरतूद नसताना खर्च केला आहे. यावर पुनः समितीने विचारणा केली की, तरतूद नाही मग कशाच्या आधारे काम केले, कोणाची मंजुरी घेतली, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, अधीक्षक अभियंत्यांनी पैसे दिले नाहीत, मात्र त्यानंतरही निविदा काढली गेली अशी चार प्रकरणे उघडकीस आल्यानंतर, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांची विभागीय चौकशी करण्याची कारवाई करण्याचा प्रस्ताव पाठविला आहे.

समितीने विचारणा केली की, शाखा अभियंत्यांनी अंदाजपत्रक कसे बनविले, उप अभियंत्यांनी शिफारस कशी केली, सक्षम प्राधिका-याने प्रशासकीय मान्यता कशी दिली, खाते प्रमुखांना १० लाख रुपयांपर्यंत मंजुरी देण्याचे अधिकार होते, म्हणजे प्रशासकीय मान्यता कार्यकारी अभियंता यांनी दिली आहे. चुकीची निविदा, चुकीची वर्क ऑर्डर, चुकीचा एलओआय, चुकीची प्रशासकीय मान्यता, चुकीची तांत्रिक मान्यता आणि चुकीचे देयक आहे. शासनाने तरतूद दिली असती तर त्या योजनेला मंजुरी दिली असती, मात्र तसे काही झालेले नाही. सदर काम करायचेच होते तर जिल्हा परिषदेच्या लेखाशिर्ष ( हेड ) मधून करायचे होते. सर्व चुकीचे आहे. सदर बाबतीत तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची जबाबदारी होती, त्यांनी या संदर्भात सांगावे. तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांनी समितीला विदित केले की, सन २०१० ला जॉईन झालो, त्यापूर्वी या प्रकरणाला प्रशासकीय मान्यता दिली होती, निविदाही काढली होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांनी कायदा पाहिला पाहिजे. तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांनी माहिती दिली की, आम्ही देयक आल्यानंतर आक्षेप घेतला होता, विभागाने याबाबत शासनाकडून अनुदान मागण्याची जबाबदारी घेतली होती. जनरल बॉडीपुढे विषय ठेवून मान्यता घेऊ, असे सांगितले होते, तसे त्यांनी केले पाहिजे होते. यावर समितीने विचारणा केली की, त्यांनी जबाबदारी घेतली, याचा अर्थ काय झाला, शासनाकडून या योजनेसाठी पैसा मंजूर आहे का, हे तपासले पाहिजे होते. पैसा येत नाही, ते बरोबर आहे. त्या लेखाशिर्षाला शासनाची मंजुरी होती का, यावर तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांनी समितीस नाही असे उत्तर दिले. यावर समितीने विचारणा केली की, मंजुरी नव्हती, ते काम निकडीचे होते तर जिल्हा परिषदेच्या एमआयकडे जे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक ( बजेट ) येते, त्यातून खर्च केला पाहिजे होता. जलसंधारण समितीची मंजुरी घ्यायला पाहिजे होती. तुमचे सर्वच चुकले आहे. मात्र तरीही तुम्ही पैसे दिले. तुम्हाला पैसे देण्याची गरज नव्हती. ही अनियमितता नाही तर बनावट दस्तऐवज आहे. जिल्हा परिषदेच्या विषय समित्यांमध्ये सदस्य निवडून जातात, त्यांचे काम काय आहे, समितीचा आक्षेप आहे, निधी उपलब्ध नसताना प्रशासकीय मान्यता देतात, कामाचा कालावधी ठरवितात, वर्क ऑर्डर देतात, निधीचा कालावधी घेतात, जनरल बॉडीमध्ये ठराव घेऊन पैसे नसताना पैसे देतात, चार वर्षांनी शासनाकडे मागणी करतात, लक्षात आल्यानंतर मागणी करतात, हे योग्य नाही. निधी नसताना प्रशासकीय मान्यता देतात, जनरल बॉडीमध्ये ठराव घेतात, पैसे देतात, मग चार वर्षांनी पैशाची मागणी करतात. सर्व गोष्टी परस्पर विरोधी आहेत. कामाला मंजुरीच नव्हती तर निधी

उपलब्ध करून देण्याची खात्री काय होती, मूळ विषयाच्या संदर्भात समितीच्या सन्माननीय सदस्यांनी सर्व गोष्टी निदर्शनास आणून दिल्या आहेत. अनियमितता झाली आहे, प्रक्रियेचा पाठपुरावा झालेला नाही. आता त्यावर जास्त चर्चा करण्यापेक्षा माननीय समिती प्रमुख यांनी निर्देश द्यावेत. विषयाच्या संदर्भातील फॅक्टस् समोर आलेल्या आहेत. आपण निर्देश द्यावेत. सदर विषयाच्या संदर्भात गैरप्रकार झाला आहे. निधी उपलब्ध नसताना जिल्हा परिषद अध्यक्षांचे अधिकार डावलून नियमबाह्य काम झालेले आहे. कामासाठी पैशाची तरतूद नव्हती. गैरप्रकार झालाच आहे. पैशाची तरतूद नसताना कार्यारंभ आदेश देणे, पैस येणार आहेत, असे ठरवून पैसे येण्याची खात्री नसताना, पैसे येणार आहेत, असे दाखवून अनियमितता मोठ्या प्रमाणात झाली आहे. ठराव सन २०११ ला झाला असेल, परंतु लेखा आक्षेपात सदर बाब आल्यानंतर, सर्व गोष्टी पुढे येत असतील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांनी मांडलेले मत कोणीही पाहत नसतील, अधिकारांचा गैरवापर करीत असतील तर ही बाब गंभीर आहे. अशी समितीने नाराजी व्यक्तकरून पुढीलप्रमाणे संबंधितांना निदेश दिले. या प्रकरणाची सखोल चौकशी करणे गजरेचे आहे. सखोल चौकशी करावी, दोषी कोण आहेत, ते पहावे, दोषींवर आपल्या माध्यमातून तत्काळ कारवाई झाली पाहिजे. आपण सदर विषयाच्या संदर्भातील सविस्तर अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करावा. समिती या प्रकरणी ग्रामविकास, पाटबंधारे व वित्त या विभागांच्या सचिवांची तसेच इतर संबंधितांची साक्ष घेणार आहे. आपण काल देखील हा मुद्दा बैठकीमध्ये घेतला आहे. तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, देखील हे पाहिले होते. मात्र तत्संदर्भात निदेश दिले नव्हते. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, देखील या संदर्भात जबाबदारी होती, मात्र त्यांनी तरी पाळलेली नाही. समिती या विषयाच्या संदर्भात संबंधित सर्व विभागांच्या सचिवांची साक्ष घेत आहे. तत्पूर्वी आपण आपल्या स्तरावर या विषयाच्या संदर्भात सखोल चौकशी करावी, दोषींवर कारवाई करावी आणि समितीला एक महिन्याच्या आत सविस्तर अहवाल सादर करावा.

**उपरोक्तमाहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सन २००८-०९ आणि सन २०११-१२ या वर्षाचे अहवालातील मुद्या क्रमांक १३१, १३२ आणि १९२, १९३ व १९४ यापैकी मौजे सुंदरनगर ता.चाळीसगांव येथील गावतळ्याची दुरूस्ती करीता प्रत्यक्षात अनुदान उपलब्ध झाल्याखेरीज निविदा प्रक्रिया सुरू करू नये अशी अट असताना सदरहू कामाचे कार्यरंभ आदेश देवून नियमाचा भंग केल्याने ५४/२ प्रमाणे शासकीय कामात अनियमीतता केल्याने शासनाने संबंधिताविरूद्ध कोणती कारवाई केली आहे ?

(२) सदरहू कामासाठी रुपये ६.६९ लक्ष रकमेचा करारनामा न करता कार्यारंभ आदेश दिल्या प्रकरणी सखोले चौकशी करण्यात आली आहे काय ? त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत अधिका-याविरूध्द द्ध द्ध द्ध द्ध द्ध कोणती कारवाई करण्यात आली ?

**उपरोक्तमुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) सुंदरनगर येथे गावतळ्याची दुरूस्तीचे काम लेखाशिर्ष १४७९ मधून सन २००९-१० मंजूर करण्यात आले होते. त्यास अधिक्षक अभियंता नाशिक यांनी दिनांक २ डिसेंबर, २००९ रोजी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. प्रशासकीय मान्यतेचा आदेशात अट क्रमांक ५ मध्ये प्रत्यक्ष अनुदान उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरू करण्यात येवू नये अशी अट नमूद होती. तरी ही तत्कालीन कार्यकारी अभियंता श्रीमती आर.डी.घाणे यांनी सदर कामाची निविदा काढून कार्यारंभ आदेश अनुदान प्राप्त होण्यापूर्वीच दिलेला आहे. त्याबद्दल त्यांचे विभागीय चौकशीत हा वाढीव आरोप ठेवण्यात आलेला आहे. सद्यास्थितीत शासनाकडून दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी रक्कम रुपये ६.८० लक्ष अनुदान उपलब्ध झालेले असून त्यातून जिल्हा परिषद सेफंडातील निधीचे समायोजन करण्यात आलेले आहे. सदर कामासाठी करारनामा करूनच कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे.

(२) सदर कामासाठी करारनामा करूनच कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. त्यामुळे या बाबीसाठी कोणालाही दोषी धरण्यात आलेले नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, जळगाव यांनी दिलेल्या माहितीशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्तमुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, तालुका चाळीसगांव, मौजे सुंदरनगर येथील गावतळ्यांची दुरुस्तीबाबत विभागीय चौकशी सुरू आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी असे विदित केले की, चौकशी सुरू आहे यावर समितीने विचारणा केली की, तात्काळ विभागीय चौकशी पूर्ण झाली पाहिजे व विभागीय चौकशी केव्हापासून सुरू आहे व केव्हा संपणार आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी पुढील प्रमाणे खुलासा केला की, संबंधितांना आपण दिनांक ९ मे, २०१६ रोजी चार्जशीट

दिलेली आहे. चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक सन २०१७ मध्ये झालेली आहे. चौकशी सुरू असून तात्काळ याबाबतची प्रक्रिया पूर्ण करावी म्हणून आपण दोन वेळा स्मरणपत्र दिले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, दुसरे स्मरणपत्र केव्हा दिले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी सांगितले की, दिनांक ४ जुलै, २०१८ रोजी दिले आहे. यानंतर समितीने निदेश की, सन २०१७ मध्ये चौकशी सुरू झाली, याला कालमर्यादा घालून देण्यात यावी. व लवकरात लवकर चौकशी पूर्ण करावी.यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होय असे उत्तर दिले

**अभिप्राय व शिफारशी**

जळगांव जिल्हा परिषद अंतर्गत मौजे सुंदरनगर, ता.चाळीसगाव येथील गावतळ्याच्या दुरूस्तीबाबत जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे घेण्यात आलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, मौजे सुंदरनगर येथील गावतळ्याच्या दुरूस्तीसाठी अनुदान प्रत्यक्ष उपलब्ध झालेले नसताना निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येऊ नये अशी अट कामामध्ये असतांना देखील गावतळ्याच्या दुरूस्तीचे रुपये ६ लाख ६९ हजार रूपयांचे कार्यारंभ आदेश दिनांक १९ डिसेंबर, २००९ रोजी देण्यात आले ही बाब अतिशय गंभीर व चुकीची आहे. सदर कार्यारंभ आदेश करारनामा न करता देण्यात आले आहेत. गावतळे दुरूस्तीच्या कामाला दिनांक २ डिसेंबर, २००९ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून १७ दिवसामध्ये म्हणजेच दिनांक १९ डिसेंबर,२००९ रोजी एवढया तातडीने कार्यारंभ आदेश दिले त्याबद्दल समितीस आश्चर्य वाटते, कारण या कामासाठी लेखाशिर्षामध्ये निधी प्राप्त नसताना जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून या कामावर रक्कम खर्च करण्यात आली आहे. एखादया निकडीच्या अथवा आपत्तीजनक घटना घडली असेल तर केवळ जिल्हा परिषद अध्यक्षांना विशेषाधिकाराचा वापर करून निधी खर्च करता येऊ शकतो.

तथापि, सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ५२६ दिनांक ४ जून, २०११ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये देयक प्रधान केलेले आहे त्याअर्थी काम पूर्ण झाल्यानंतर जवळपास दहा महिन्यांनी स्वनिधीतून निधी खर्च करण्याचा ठराव जिल्हा परिषदेने केला त्यानंतर सदर कामाचे अनुदान शासनाकडून प्राप्त करण्यासाठीचा प्रस्ताव जवळपास चार वर्ष एवढया प्रदीर्घ विलंबाने म्हणजे दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी सादर केला. तत्कालिन कार्यकारी अभियंता यांनी कार्यारंभ आदेश दिला नसताना यासंदर्भात लेखा संहितेनुसार तपासणी करणे आवश्यक होते. त्यामुळे सकृतदर्शनी या ठिकाणी अनियमितता झाल्याचे दिसून येते. मुख्य लेखा व वित्त अधिकारी नियंत्रण अधिकारी आहेत लेखाशिर्षामधून गावतळ्याच्या दुरूस्तीचा खर्च भागविला जावा अशी शिफारस करण्यासाठी हा विषय जिल्हा परिषदेच्या विषय समितीने ठेवलेला नसताना दीड वर्षानंतर जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण मंडळा समोर ठरावास मान्यता घेऊन जिल्हा परिषेदेच्या निधीतून रक्कम घेणे योग्य नाही ज्या लेखाशिर्षामधून कामे घेतली आहेत. त्या लेखाशिर्षामधून त्यावर खर्च करणे करणे आवश्यक आहे. मात्र सदर कामाला कार्योतर मंजुरी घेतल्याचे दिसून येत असून शासनाकडे चार वर्षानंतर गावतळ्याच्या दुरूस्तीच्या झालेल्या खर्चाबाबतचा प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यामुळे **संबंधित तत्कालिन कार्यकारी अभियंता व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी एकप्रकारे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या अधिकाराचा दुरूपयोग केल्याचे या ठिकाणी दिसून येत आहे. संबंधितांना दिनांक ९ मे, २०१६ रोजी दोषारोप दाखल केलेले आहे. या प्रकरणी सन २०१७ पासून सुरू असलेल्या चौकशी कालमर्यादा घालून द्यावी. लवकरात लवकर चौकशी पूर्ण करून संबंधित जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, जळगांव (प्रशासन)

### जिल्हा परिषद स्वःउत्पन्न उपकराच्या रकमा विलंबाने प्राप्त झाल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत जळगांव, जिल्हा जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-१३ या वर्षात स्थानिक उपकर, वाढीव उपकर व मुद्रांक शुल्क यांच्या रकमा विहित मुदतीत संबंधित विभागाकडून प्राप्त झाल्या आहेत काय, पंचायत समित्यांना भेटी देण्यात आल्या, त्यावेळी असे समजले की, अनेक पंचायत समित्यांना विहित मुदतीत या रकमा प्राप्त झालेल्या नाहीत. तरी याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी स्पष्टीकरण द्यावे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीला खुलासा केली की, उपकराच्या रकमा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जिल्हा परिषदेला प्राप्त होतात, त्या उशिरा मिळत असल्यामुळे आपल्या स्तरावरुन पंचायत समित्यांना उशिरा द्याव्या लागत आहेत. त्यामुळे पंचायत समित्यांच्या स्तरावर त्या रकमा उशिरा प्राप्त झालेल्या दिसत आहेत. यावर समितीने विचारणा केली की, सदर मुद्याच्या संदर्भातील विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी जिल्हाधिका-यांना देखील बोलाविण्यात यावे. जिल्हा परिषदेची तक्रार आहे की, जिल्हा परिषदेला अनुज्ञेय असणा-या रकमा उशिरा प्राप्त होत असल्यामुळे ते पंचायत समित्यांना उशिरा देतात. आयुक्त कार्यालय या संदर्भात काय करते, तपासणी करून विहित मुदतीत म्हणजे ड्यू कोर्समध्ये रकमा त्यांना मिळाल्या की नाहीत, हे पाहण्याची जबाबदारी विभागीय आयुक्तांची नाही का, आयुक्तकार्यालयाचीच ही जबाबदारी आहे. शासन म्हणून ग्रामविकास विभागाने या संदर्भात सांगावे, अशी समितीने विचारणा केली असता, पाठपुरावा केला पाहिजे. असे उप सचिव ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले.

पुन्हा समितीने यावर विचारणा केली की, जिल्हाधिका-यांकडून उशिर लागतो. आयुक्त कार्यालयाने निरीक्षण करावयाचे आहे. निरीक्षण चालू वर्षाचे होते. तसेच जिल्हाधिका-यांनी जिल्हा परिषदेला उशिरा रकमा दिल्यामुळे जिल्हा परिषदेने पंचायत समित्यांना उशिरा दिल्या. शासनाचे टप्पे ठरले आहेत. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, तिमाही भागात (हिश्यात) द्यायचा आहे. यावर समितीने विचारणा केली की, तिमाही भाग (क्वॉर्टरली पार्ट) आलेला आहे की नाही, हे पाहण्याची जबाबदारी कोणाची आहे? तसेच सन २०१२-१३ ची रक्कम मिळाली आहे का, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी होय, असे उत्तर दिले. समितीने विचारणा केली की, तिमाही अनुदान (क्वॉर्टरली ग्रँट) द्यायचे आहे. शासनाकडून अमुक आले नाही, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अमुक आले नाही, या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या मार्फत पाठपुरावा (पर्स्युशन) करण्याकरिता तिमाही बैठका होतात का, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस नाही असे विदित केले. यावर समितीने विचारणा केली की, नियमात असेल तर बैठका का घेतल्या नाहीत? शेवटच्या दिवशी अनुदान (ग्रँट) येते, हेही बरोबर नाही त्यामुळे खर्च करता येत नाही. मागासवर्गीयांच्या योजना पंचायत समितीच्या स्तरावरून ग्रामपंचायतीच्या स्तरावर शेवटच्या टप्प्यापर्यंत, शेवटच्या घटकापर्यंत पोहचविता येत नाहीत. आपण त्यासंदर्भात पाठपुरावा (पर्स्युएशन) का करीत नाही, सदर बाबतीत जबाबदारी निश्चित होणे गरजेचे आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होय असे उत्तर दिले. यावर समितीने संबंधितांना निदेश दिले की, आपण या संदर्भात गंभीरपणे विचार करावा. कारण यामुळे योजनांवर परिणाम होत आहे. ही गंभीर बाब आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्हा परिषद स्वःउत्पन्न उपकराच्या रकमा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उशिरा प्राप्त होत असल्याने विहीत मुदतीत अनुदान प्राप्त न झाल्याने मागासवर्गीयांच्या योजना ग्रामपंचायातच्या शेवटच्या स्तरापर्यंत पोहचत नसल्याने विभागीय आयुक्तांनी संबंधित अधिका-यांना कोणते निर्देश दिले आहेत.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलमान्वये कर / उपकराचे अनुदान जिल्हा परिषदेस देणेसाठी ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एलएफसी १०९२/ सीआर १९६३/ २४, दिनांक २२ एप्रिल, १९९२ अन्वये अनुदान वितरणाची कार्यवाही नमूद आहे. सन २०१५-१६ पर्यंत ग्रामविकास विभागाकडून प्राप्त झालेली अनुदाने विभागीय आयुक्तांमार्फत जिल्हाधिकारी व जिल्हाधिका-यांमार्फत जिल्हा परिषदेस वितरीत करण्यात येत होती. सन २०१६-१७ पासून यात्राकराऐवजी सहाय्यक अनुदान व आदिवासी व मागास भागातील ग्रामपंचायतींना वित्तीय सहाय्यची अनुदान वगळता कर/ उपकराची अनुदाने ही ग्रामविकास विभागामार्फत थेट जिल्हाधिकारी यांना वितरीत करण्यात येऊन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत जिल्हा परिषदेस अनुदाने वितरीत करण्यात येत आहेत. सन २०१२-१३ ची शासनाकडून प्राप्त झालेली अनुदाने आयुक्त कार्यालयामार्फत जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी मार्फत जिल्हा परिषदेला वाटप करण्यात आलेली आहे. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद / ग्रामपंचायतसाठी प्राप्त झालेले अनुदान विवरणपत्र “अ” व “ब” मध्ये सोबत जोडलेले आहे. शासनाकडून मंजूर झालेले अनुदान

जिल्हाधिकारी यांना वितरीत करतांना शासन निर्णय दिनांक २२-४-१९९२ अन्वये विहित केलेल्या पद्धतीनुसार विनाविलंब मंजूर करावेत असे वितरण आदेशात नमूद करण्यात येते. तसेच विभागीय आयुक्तयांचेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद यांच्या कामकाजाचा आढावा घेत असतांना अनुदाने विहित कालावधीत पंचायत राज संस्थाना वितरण करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय-** जिल्हा परिषद व विभागीय आयुक्त कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

# सन २०१२-१३ मधील वितरीत केलेल्या रक्कमाचे विवरणपत्र–अ (जिल्हा परिषद)

| अ. क्र | लेखा शिर्ष | ग्रामविकास विभागाने (बिडीएस) वर वितरीत केलेल्या आदेशाचा क्रं.व दिनांक | अनुदाना ची रक्कम | आयुक्तांनी सदरील अनुदान (बिडीएस) वर वितरीत केलेल्या आदेशाचा क्रं.व दिनांक जि.प. जळगांव साठी) | अनुदानाची रक्कम (जि.प. जळगांव साठी) | जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदेस (बिडीएस) वर वितरीत केलेल्या आदेशाचा क्रं.व दिनांक (जि.प. जळगांव साठी) | रक्कम | मुख्य कार्यकारी यांनी संबंधीत निधी आहरीत केल्याचा आदेशाचा क्रं.व दिनांक | रक्कम | संबंधीत जिल्हा परिषदांनी निधी आहरित न करण्याची कारणे | मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निधी आहरीत न केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या वर केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | जिल्हा परिषदांना जमिन महसूल अनुदान | एलएफसी-२०१२ /प्र.क्र.४५/ वित्त / दि.८/५/२०१२ | ९१४३२००० | विकास/ लेखा ३-२/२१७६२/ १२/दि.११/५ /२०१२ | ३२६०००० | क्रं.जमिन / १/ अनुदान /कावि/३७७/२०१२ दि.१३/७/२०१२ | २८८६९३७ | १-.ग्राप/लेखा/ आरआर ४०५ दि.२०/९/१२ २- क्रं.ग्राप/लेखा/ आर आर ४०३ दि.२०/९/१२ ३- क्रं.ग्राप/लेखा/ आर | २८८६९३७ | ---- | ---- |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | आर ४०४ दि.२०/९/१२ ३- | | | |
| | | दिनांक ३/८/२०१२ | ३४७ ४१२ ००० | विकास/लेखा ३-२/३५७९०/१२दिनांक २९/८/२०१२ | १२४ २०० ०० | क्रं.जमिन/१/अनुदान/कावि/६८४२०/२०१२ दि.५/१२/२०१२ | १२४०७७१९ | क्रं.ग्राप/लेखा/आरआर ४३५ दि.२८/१२/१२ | १२४०७७१९ | --- | --- |
| | | दिनांक १३/२/२०१३ | १०९ ७१२ ००० | विकास/लेखा ३-२/१०९५६३/१२दिनांक ७/३/२०१३ | ३९२ २००० | क्रं.जमिन/१/अनुदान/कावि/१६९/२०१३ दि.२०/३/२०१३ | ३९११७६० | क्रं.ग्राप/लेखा/आरआर ५०६ दि.२५/३/१३ | ३९११७६० | --- | --- |
| २ | थकित वाढीव उपकर (पुरवणी) | बीजीटी-२०१२/प्र.क्र.४९/कावि/वित्त ३/दि.१३/३/२०१३ | १०७ ३३७ १००० | विकास/लेखा ३-२/१११३८०/१३ दिनांक २८/३/२०१३ | ३४८ ३३० ०० | क्रं.जमिन/१/अनुदान/कावि/१८९/२०१३ दि.२९/३/२०१३ | ३४८३३००० | क्रं.ग्राप /लेखा/आर आर ५१८ दि.३०/३/१३ | ३४८३३००० | --- | --- |
| ३ | जिल्हा परिषदांना जमिन | एलएफसी-२०१२/ | ६१४८६००० | विकास/लेखा ३-२/१७६३/ | ८६० ००० | क्रं.जमिन/१/अनुदान/कावि/३ | ८५९८४१ | क्रं.ग्राप/लेखा/आरआर | ८५९८४१ | --- | --- |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महसूल वरील वाढीव उपकर अनुदान | प्र.क्र.४४/वित्त ३/दि.८/५/२० १२ | | २०१२ दिनांक ११/५/२०१ २ | | ७९/२०१२ दि.१७/७/२०१२ | | ४०४ दि.२०/९/१२ | | | |
| | | दिनांक ३/८/२०१२ | २३३६४४०० ० | विकास/ले खा ३- २/६०४/२० १२ दिनांक ५/१०/ २०१२ | १०३० ००० | क्रं.जमिन/१/अ नुदान/कावि/१७ ०/२०१२.३ दि.२०/३/२०१३ | ८९४५३६ | क्रं.ग्राप/लेखा/ आर आर ५०४ दि.२५/३/१३ क्रं ग्राप/लेखा /आरआर ५०५ दि.२५/०३/१३ | ३५७८१४ | ---- | --- |
| | | दिनांक २४/२/२०१३ | ७३७८३००० | विकास/ले खाअ३- २/४७९५१/ २०१३ दिनांक ७/३/२०१३ | ३२४५००० | क्र.जमिन/१/अ नुदान/कावि/६ ८३/२०१२ दिनांक ५/७/२०१२ | ३२४२७०१ | १क्रं.ग्राप/लेखा / आरआर४३७ दि.२८/१२/१२ २- क्रं.ग्राप/लेखा/ आरआर४३६ दि.२८/१२/१२ | ३२४२७०१ | ----- | ---- |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | थकित वाढीव उपकर (पुरवणी) | बीजीटी-२०१२/ प्र.क्र.११५/वित्त३ /दि.३/८/२०३ | १०७ ३३७ १००० | विकास/लेखा ३-२/१२१२/२०१३ दिनांक १५/३/२०१३ | ७१४६६० ०० | १)क्रं.जमिन/१/अनुदान/कावि/१७२/२०१३ दि.२१/३/२०१३ २) क्रं.जमिन/१/अनुदान/कावि/१७३/२०१३ दि.२१/३/२०१३ ३)क्रं.जमिन/१/अनुदान/कावि/१७५/२०१३ दि.२१/३/२०१३ | ५९०९८८५८ | १)क्रं.ग्राप/लेखा/आरआर५०७ दि.२५/३/१३ २)क्रं.ग्राप/लेखा/आरआर५१० दि.२५/३/१३ ३)क्रं.ग्राप/लेखा/आरआर५११ दि.२५/३/१३४)क्रं.ग्राप/लेखा/आर आर ५०९ दि.२५/३/१३ ५)क्रं.ग्राप/लेखा/आरआर५०८ दि.२५/३/१३ | ९३९९३६१ १९३९३१५९ २९०८९७३९ ४८६६४० ७२९९५९ | --- | --- |

## सन २०१२-१३ मधील वितरीत केलेल्या रक्कमाचे विवरणपत्र–ब (जिल्हा परिषद)

| अ.क्र | लेखाशिर्ष | ग्रामविकास विभागाने (बिडीएस) वर वितरीत केलेल्या आदेशाचा क्रं.व दिनांक | अनुदानाची रक्कम | आयुक्तांनी सदरील अनुदान (बिडीएस) वर वितरीत केलेल्या आदेशाचा क्रं.व दिनांक (जि.प.जळगांव साठी) | अनुदानाची रक्कम (जि.प.जळगांव साठी) | जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदेस (बिडीएस) वर वितरीत केलेल्या आदेशाचा क्रं.व दिनांक (जि.प. जळगांव साठी) | रक्कम | मुख्य कार्यकारी यांनी संबंधीत निधी आहरीत केल्याचा आदेशाचा क्रं.व दिनांक | रक्कम | -- | -- |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | ग्रामपंचायतींना जमिन समानिकरण/ महसूल अनुदान | अर्थस-२०१२/प्रशि/२४/वित्त-२ दि.६/८/२०१२ | ४७४६६०४ | विकास/लेखा ३-२/६०८/१२ दिनांक८/१०/२०१२ | १५२००० | क्रं.साशा/ग्रामप/कावि/ १४५४/२०१२ दि.१९/१२/२०१२ | १५२००० | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ४४८ दि.१६/१/१३ | १५२००० | | |
| | | अर्थस-२०१२/प्रशि/२४/वित्त-२दि.११/२/२०१३ | १५८२२०१ | विकास/लेखा ३-२/७५०७/१३ दिनांक ७/३/२०१३ | ५१००० | क्र.साशा/ग्रामप/कावि /२००/२०१३ दि.१२/३/२०१३ | ५१००० | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ९५ दि.२०/३/१३ | ५१००० | | |
| | | | | विकास/लेखा ३-२/१११३७६ /१३ दिनांक २८/३/२०१३ | ५३००० | क्र.साशा/ग्रामप/कावि /३०५/२०१३ दि.२९/३/२०१३ | ५३००० | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ५१९ दि.३०/३/१३ | ५३००० | | |
| | थकीत अनुदानाची (पुरवणी मागणी) | अर्थस-शा.नि.पुरवणी / २०१२/प्रशि/६२/वित्त-२ | ६८७४१८ | विकास/लेखा ३-२/१११३७८ /१३ दिनांक २८/३/२०१३ | ५७४१८ | क्र.साशा/ग्रामप/कावि/ ३०६/२०१३ दि.२९/३/२०१३ | ५७४१८ | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ५१९ दि.३०/३/१३ | ५७४१८ | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | मागास व आदीवासी तील ग्रामपंचायतीनां वित्तीय सहाय्य (२५१५००४ ४) | अर्थस-२०१२ प्र.शि/१९ /वित्त-२ दि.६/८/२०१३ | ४१४३६१ | विकास/लेखा ३-२/४०००४२ /१२ दिनांक ५/९/२०१२ | ९००० | क्र.साशा/ग्रामप/कावि/ १४५६/२०१२ दि.१९/१२/२०१२ | ९००० | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ४१५ दि.१६/१/१३ | ९००० | | |
| | | अर्थस-२०१२ प्र.शि/१९ वित्त-२ दि.११/२/२०१३ | ५५२४८ | विकास/लेखा ३-२/७५०५/१३ दिनांक७/३/२०१३ | २००० | क्र.साशा/ग्रामप/कावि/ १९९/२०१३ दि.१२/३/२०१३ | २००० | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ५२० दि.१६/१/१३ | २००० | | |
| | | अर्थस-२०१२ प्र.शि/१९ वित्त-२ दि.२६/३/२०१३ | ८२८७३ | विकास/लेखा ३-२/१११३८४ /१३ दिनांक २८/३/२०१३ | १००० | क्र.साशा/ग्रामप/कावि/ ३०३/२०१३ दि.२९/३/२०१३ | १००० | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ९९ दि.२०/३/१३ | १००० | | |
| ३ | थकीत अनुदानाची (पुरवणी मागणी) | शा.नि.पुरव णी/२०१२/प्रशि/६६ /वित्त-२ दि.२५/३/२०१३ | ३८५२००/- | विकास/लेखा ३-२/१११३८४ /१३ दिनांक २८/३/२०१३ | १२५० | क्र.साशा/ग्रामप/कावि/ ३०४/२०१३ दि.२९/३/२०१३ | १२५० | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ५२० दि.१६/१/१३ | १२५० | | |
| ४ | मुद्रांक शुल्क अनुदान (३६०४०३०७ ) | बीजीटी२०१२/प्रशि/ ४९/वित्त३/ दि.३/८/२०१२ | ३६००००००० | विकास/ लेखा ३- २/१११३८४ /१३ दिनांक २८/३/२०१३ | ५५२२८००० | क्रं.का.-७/जिपमुशु /अनु-३६०४/ १०००/१२ दि.१०/८/२०१२ | ५५२२८ ००० | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ४०१ दि.२०/९/१२ | २८०१७००० | | |
| | | ११/२/२०१३ | ९०००००० | ------- | १९७७६००० | क्रं.का.-७/जिपमुशु/ उर्व/अनु-३६०४/ | १९७७६ ००० | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ५२० दि.१६/१/१३ | १९७७६००० | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | १७६/१२<br>दि.१०/८/२०१२ | | | | | |
| | पुरवणी मागणी | बीजीटी-२०१२/प्रशि/६३/वित्त ३/दि.३१/८/२०१२बीजीटी-२०१२/प्रशि/४९/वित्त ३/दि.०३/८/२०१२ दिनांक २/३/२०१३ | ६११६००००० ९९३७५००० २०३९४१००० | -------- ------- | २८०१७००० १४६१००० | १क्रं.का.-७/जिपमुशु / १२-१३/१२७८/१२ दि.१९/१२/२०१२ २क्रं.का.-७/जिपमुशु /१२-१३/१२८२/१२ दि.२०/१२/२०१२ क्रं.का.-७/जिपमुशु /पु-अनु-३६०४/ २०४/१२- दि.१२/३/२०१३ | २५९५८००० २०५९००० १४६१०० ० | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ४४६ दि.१६/१/१३ क्र.ग्राप/लेखा/ आरआर९१ दि.२०/३/१३ | २८०१७००० १४६१००० | | |
| ५ | मोटार वाहना वरील कर ३६०४०२९२ | बीयुडी/२०१२/प्रशि/ ४८ वित्त-३/दि.३/८/२०१२ | ४३५००० | ------- | -------- | ---------- | ----- | | | | |
| | | ११/२/२०१३ | १०९००० | ------- | ६७१०४ | -------- | ६७१०४ | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ९२ दि.२०/३/१३ | १४६१००० | | |
| ६ | व्यवसाय व्यापार व नोक-यावरील कर ३६०४०४२३ | बीयुडी/२०१२/प्रशि/ ४८ वित्त-३/दि.३/८/२०१२ ११/२/२०१३ | २१९३००० ५४९००० | ----- | ३८४८५२ | ------ | ३८४८५२ | क्रं.ग्राप/लेखा/आर आर ९३ दि.२०/३/१३ | ३८४८५२ | | |

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत जळगांव जिल्हा परिषदेला भेट दिली असता, समितीच्या असे निदर्शनास आले की, जळगांव जिल्हा परिषदेकडून सन २०१२-१३ या वर्षात स्थानिक उपकर वाढीव उपकर व मुद्रांक शुल्क यांच्या रकमा पंचायत समित्यांना विहित मुदतीत प्राप्त झाल्या नाहीत जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलमान्वये कर/उपकर अनुदान जिल्हा परिषदेला देण्यासाठी ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एलएलसी १०९२/सीआर १९६३/२४, दिनांक २२ एप्रिल, १९९२ अन्वये अनुदान वितरणाची कार्यवाही नमूद आहे. सन २०१५-१६ पर्यत ग्रामविकास विभागाकडून प्राप्त झालेली अनुदाने विभागीय आयुक्तांमार्फत जिल्हाधिकारी व जिल्हाधिका-यांमार्फत जिल्हा परिषदेस वितरीत करण्यात येत होती. सन २०१६-१७ पासून यात्राकराऐवजी सहाय्यक अनुदान व आदिवासी व मागास भागातील ग्रामपंचायतींना वित्तीय सहाय्याची अनुदाने वगळता कर उपकराची अनुदाने ही ग्रामविकास विभागामार्फत थेट जिल्हाधिकारी यांना वितरीत करण्यात येऊन जिल्हाधिका-यांमार्फत जिल्हा परिषदेस वितरीत करण्यात येत आहेत. सन २०१२-१३ ची शासनाकडून प्राप्त झालेली अनुदाने आयुक्त कार्यालयामार्फत जिल्हाधिकारी व जिल्हाधिका-यामार्फत जिल्हा परिषदेस वाटप करण्यात आलेली आहेत, असे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये नमूद करण्यात आले आहे.

यासंदर्भात साक्षी दरम्यान समितीला विदित करण्यात आले की, उपकराच्या रकमा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जिल्हा परिषदेला प्राप्त होतात त्या उशिरा प्राप्त होत असल्यामुळे जिल्हा परिषदेकडून पंचायत समित्यांना उशिराने द्यावे लागत आहेत. यासंदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयाने जिल्हा परिषदेला अनुज्ञेय असणा-या रकमा तपासणी करून विहित मुदतीत प्राप्त होतात का नाही हे पाहण्याची व पाठपुरावा करण्याची जाबाबदारी विभागीय आयुक्तांची आहे. **जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपकराच्या रकमा जिल्हा परिषदेत वितरीत करण्यासाठी विलंब होत आहे. पर्यायाने जिल्हा परिषदेकडून पंचायत समित्यांना सदर रकमा विलंबाने द्याव्या लागत आहेत. सदर रकमा तिमाही भागात प्राप्त होणे आवश्यक आहे. याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्यामार्फत पाठपुरावा करण्याकरिता तिमाही बैठका घेण्यात येत नाही असे समितीस आडळून आले, बैठकांअभावी शेवटच्या दिवशी अनुदान प्राप्त होत असल्यामुळे मागासवर्गीयांच्या योजना पंचायत समितीच्या स्तरावरून ग्रामपंचायतीच्या स्तरावर, शेवटच्या टप्प्यापर्यंत, शेवटच्या घटकापर्यंत पोहचविता येत नाहीत, ही बाब अतिशय गंभीर असून समितीने याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली. याप्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात यावी, व त्यानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, जळगांव (प्रशासन)

### समितीने शाळांना भेटी देते वेळी जिल्ह्यातील काही पंचायत समिती क्षेत्रातील शाळांचे किमान ५० टक्के विज देयक प्रलंबित असल्यामुळे विज पुरवठा बंद केल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत जळगांव जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने जिल्ह्यातील काही पंचायत समिती क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शाळांना भेटी दिल्या. भेटीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, किमान ५० टक्के शाळांचे वीज कनेक्शन देयक प्रलंबित असल्यामुळे कापण्यात आलेले आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांना घरगुती दराने नव्हे तर वाणिज्यिक दराने वीज दर आकारला जातो. हा दर शाळांना परवडत नाही, परिणामी वीज देयक थकीत होत जाते. म्हणून समितीच्या माध्यमातून या वीजदरा संदर्भात शासन स्तरवर पाठपुरावा करणे गरजेचे आहे, असे समितीने मत व्यक्तकरून पुढील प्रमाणे विचारणा केली की, शाळांना घरगुती किंवा वाणिज्यिक या दराने वीज दर न आकारता या दोन्हींतील मध्यम दर आकारला पाहिजे. शाळांना नेमका कोणत्या दराने वीज दर आकारणे योग्य होईल समितीला असे वाटते की, शाळांना वीज देयकच आकारता कामा नये या दृष्टीने समितीच्या माध्यमातून प्रयत्न करणे योग्य होईल. जो अखर्चित निधी शिल्लक आहे तो कोणत्या खात्यात ठेवलेला आहे, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, अखर्चित निधी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत चालू खात्यात ठेवला जातो. यावर समितीने विचारणा केली की, एवढया मोठ्या प्रमाणावर निधी ठेवत असताना तो मुदत ठेवीमध्ये ठेवावयास पाहिजे. मुदत ठेवीच्या वाढीव दराबाबत बँकेसोबत सौदा (बार्गेनींग) केले पाहिजे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, यातील काही निधी मुदत ठेवीच्या स्वरुपात सुद्धा ठेवला जातो.

वरील दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने पुढील प्रमाणे मत व्यक्त केले की, समितीने दौ-याच्या निमित्ताने ज्या ज्या बाबींवर धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे शाळांना कायमस्वरुपी योग्य दरात वीज पुरवठा झाला पाहिजे. शाळा डिजीटल करण्यासाठी काही बाबी करण्याची आवश्यकता आहे. वीज दराचा प्रश्न केवळ या जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण राज्याशी निगडित आहे. सदर बाब माननीय ऊर्जा मंत्री यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. खनिकर्मच्या माध्यमातून प्राप्त होणा-या निधीचे प्रमाण आता ६०:४० असे करण्यात येत आहे. एकंदरीत या संपूर्ण विषयाच्या संदर्भात ऊर्जा विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

समितीने शाळांना भेटी देते वेळी जिल्ह्यातील काही पंचायत समिती क्षेत्रातील शाळांचे किमान ५० टक्के विज देयक प्रलंबित असल्यामुळे वीज पुरवठा बंद केल्याचे निदर्शनास येणे. वाणिज्यीक दराने वीज दर आकारणे, सदरहू दर शाळांना परवडत नसल्यामुळे परिणामी वीज देयक थकीत होत आहेत याबाबत शासनस्तरावर शाळांना कायमस्वरूपी योग्य दरात वीज पुरवठा व शाळा डिजीटल करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

**उपरोक्त मुदयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद शाळांच्या वीज बिलाची आकारणी ही आजही वाणीज्यिक दराने होत असल्याचे खरे आहे. जळगांव जिल्ह्यातील एकूण १८४७ शाळा पैकी १२४८ शाळा या डिजीटल झालेल्या असून ५७८ शाळांमधील एकूण ५६,७२,२८८,०० रक्कम रुपये वीज बील वाणीज्य दराने वीज बीलाची आकारणी केल्याने वीज कनेक्शन कट केलेले आहेत. सदरहू बाब ही शासन स्तरावरील धोरणात्मक निर्णय असून या बाबत जिल्हा परिषदेचा सतत पाठपुरावा सुरू आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय.

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** जळगांव जिल्ह्यातील ३३०२ शाळांपैकी २६९० शाळांना वीज उपलब्ध आहे. त्यातील ४७८ शाळांना वीज पुरवठा सुरू नाही व १३४ शाळांना वीज उपलब्ध नाही. शाळांमध्ये वीज नसल्याची कारणे:- काही शाळांमध्ये वीजेची आवश्यकता नसणे. इलेक्ट्रीक सोर्स जास्त अंतरावर असणे. भाडयाच्या इमारतींमध्ये शाळांना वीज उपलब्ध नसणे. विज देयकाचा भरणा करण्याबाबत आर्थिक अडचण.

जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंमलबजावणीसाठी दिनांक ९ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व शाळांमधील सर्व वर्ग डिजिटल करण्याचे उदिष्टे निर्धारीत केले आहे. त्यानुसार सन २०१६-१७ पर्यंत राज्यात एकूण ६६,४५८ शाळा डिजिटल करण्यात आल्या आहेत.

**ऊर्जा विभागाचे अभिप्राय :-** शैक्षणिक संस्थाना वाणिज्यिक दराने वीज आकारणी न करता सार्वजनिक सेवा या स्वतंत्र वर्गवारीच्या दराने आकारणी करण्यात येते.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे वीज दर आदेश दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ अन्वये मा.आयोगाने उच्चदाब व लघुदाबावर सार्वजनिक सेवा (public services) ही नवी वर्गवारी लागू केली. या वर्गवारी मध्ये शैक्षणिक संस्थेचा समावेश करण्यात आलेला आहे.

माहे ऑगस्ट,२०१२ पुर्वी शैक्षणिक संस्थांचा समावेश वाणिज्य वर्गवारीत करण्यात येत होता व मा.आयोगाने निर्धारीत केलेल्या वाणिज्यिक वर्गवारीच्या वीजदरानुसार आकारणी करण्यात येत होती.

मा. आयोगान वीज दर आदेश दिनांक ३ नोव्हेंबर २०१६ नुसार दिनांक १ एप्रिल २०१८ पासून लागू असलेले घरगुती व सार्वजनिक सेवा या वर्गवारीतील वीज दराची तुलना खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र. | युनिट | (अ) सार्वजनिक सेवावर्गवारी शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये युनिट /रुपये | (ब ) सार्वजनिक सेवा वर्गवारी-अन्य युनिट / रुपये | घरगुती वर्गवारी युनिट | युनिट / रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | लघुदाब वर्गवारी | | | | |
| १ | ० ते २० केडब्ल्यू | | | १-१०० | ४.२५ |
| अ | ० ते २०० युनिट | ४.३३ | ५.४२ | १०१-३०० | ७.९९ |
| ब | २०० ते उर्वरीत युनिट | ५.५० | ७.९७ | ३०१-५०० | १०.९४ |
| २ | २० ते ५० केडब्ल्यू | ६.२८ | ८.०३ | ५०१-१००० | १२.४३ |
| ३ | ५० केडब्ल्यूच्यावर | ६.९९ | ८.३९ | १००० च्यावर | १३.७१ |
| | उच्च दाब वर्गवारी | | | रुपये प्रति युनिट | |
| १ | ६६ केव्ही पेक्षा जास्त | ७.२० | ९.०७ | ५.८२ | |
| २ | ३३ केव्ही | ७.२९ | ९.१६ | ५.९१ | |
| ३ | २२ व ११ केव्ही | ८.०२ | ९.८९ | ६.६४ | |

वरील तुलनात्मक दरातून असे निदर्शनास येते की, १०० युनिट पेक्षा जादा वापरासाठी लघुदाब सार्वजनिक सेवा वर्गवारीचे दर हे घरगुती वर्गवारीतील दराच्या तुलनेत कमी आहेत. जळगांव जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांना सार्वजनिक सेवा हा दर संकेत लागू करण्यात आलेला आहे. सद्यःस्थितीत जळगांव जिल्ह्यात एकूण १९४६ इतक्या जिल्हा परिषदेच्या शाळा असून त्यापैकी एकूण ३६७ शाळा नियमितपणे विद्युत देयकांचा भरणा करत असून उर्वरीत १५७९ शाळा थकबाकीदार आहेत. त्यापैकी ८८ शाळांचा वीज पुरवठा थकबाकीपोटी खंडीत करण्यात आलेला आहे.

ज्या शाळांकडे वीज देयकाची थकबाकी आहे अशा शाळांना महावितरण कंपनीतर्फे विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६ (१) अन्वये १५ दिवसाची नोटीस देण्यात येते. तसेच शाळेच्या प्रशासनाशीसुद्धा थकबाकीचा भरणा करण्याबाबत महावितरणच्या स्थानिक अधिका-यांकडून पाठपुरावा करण्यात येतो. तरीसुद्धा थकबाकीचा भरणा न केल्यास संबंधित शाळांचा वीज पुरवठा खंडित करणे क्रमप्राप्त होते.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने शाळांना भेटी देते वेळी जिल्ह्यातील काही पंचायत समिती क्षेत्रातील शाळांचे किमान ५० टक्के वीज देयके प्रलंबित असल्यामुळे वीज पुरवठा बंद केल्याचे निदर्शनास येणे, वाणिज्यिक दराने वीज दर आकारणे, सदरहू दर शाळांना परवडत नसल्यामुळे परिणामी वीज देयक थकीत होत आहे. यासंदर्भात समितीने संबंधितांना असे निदर्शनास

आणून देत विचारले की, शासन स्तरावर शाळांना कायम स्वरुपी योग्य दरात वीज पुरवठा व शाळा डिजीटल करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला आहे, यावर संचालक, महावितरण मंडळ यांनी विदित केले की, सन २०१२ पर्यंत कमर्शियल टॅरिफ होता. आता सन २०१२ पासून सार्वजनिक सेवा कॅटॅरिगीसाठी " अे " टॅरिफ आहे. तो घरगुती टॅरिफ प्रमाणे आहे. संभाव्य युनिट पेक्षा कमी युनिट वापरले गेले तर त्यापेक्षा सुद्धा कमी आहे. आता सर्वात कमी टॅरिफ कॅटॅगिरी मध्ये शाळा येतात.

समितीने विचारणा केली की, शाळेला शाळा अनुदान मिळते. त्यातून विद्युत बिलाचा खर्च भागविण्यात येतो. परंतु, शाळा अनुदानाची मागणी अपुरी असल्यामुळे त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. शाळा अनुदान शालेय साहित्यासाठी वापरले जाते. त्यामुळे विद्युत बिलासाठी पैसे शिल्लक राहत नाहीत. आता सर्वच वर्ग खोल्यांमध्ये पंख्यांची व्यवस्था आहे. त्यामुळे शाळा अनुदानाची रक्कम वाढविली पाहिजे. शाळांना एका वर्षाला जेवढे वीज बिल येते तेवढी रक्कम शाळा अनुदानाच्या माध्यमातून शाळांना मिळाली पाहिजे. शाळांना शिक्षक अनुदान, शाळा अनुदान व शाळा दुरुस्ती अनुदान अशा तीन लेखाशिर्ष (हेड) मधून पैसे मिळतात. तसेच आपण सोलर पॉलिसी आणणार होतो त्याचे काय झाले, यावर संचालक, महावितरण मंडळ यांनी समितीस असे विदित केले की, एमईआरसीच्या रेग्युलेशन प्रमाणे नाईट मिटरींग १ मेगावॅट पेक्षा कमी असेल तर करता येते. आपल्या सर्वच शाळांची मागणी १ मेगावॅट पेक्षा कमी आहे. तेथे रुफ्ट ऑफ सोलर लावता येते. परंतु, रुफ्ट ऑफ सोलर बसविण्यासाठी निधी कोठून उपलब्ध होणार असा विषय आहे. मेडाच्या (MEDA) माध्यमातून काही ठिकाणी तशी सुरूवात करण्यात आली होती. त्याबाबतची माहिती नंतर समितीला सादर करू शकतो. परंतु, काही ठिकाणी सुरूवात करण्यात आली होती. पुढे समितीने असा प्रश्न विचारला की, शिक्षण विभागाने त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. यावर संचालक, महावितरण मंडळ यांनी विदित केले की, आपण सांगितल्याप्रमाणे रुफ्ट ऑफ सोलर बसविले तर बिल खूप कमी होऊ शकते.

समितीने विचारणा केली की, याबाबत शिक्षण विभागाचे काय म्हणणे आहे, यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी विदित केले की, मागील काही वर्षांपासून डिजिटायझेशनचा ट्रेंड सुरू झालेला आहे. त्यामुळे विजेच्या बिलात वाढ होत आहे. तसेच, काही लोक शाळांना टेलिव्हिजन, प्रोजेक्टर, संगणक भेट देतात. त्यामुळे वीज बिलात वाढ झालेली आहे. पूर्वी बिजेचे बिल मॅनेज होत होते. आजही ब-याच ठिकाणी ग्रामपंचायत किंवा स्थानिक व्यवस्थेमार्फत विजेची व्यवस्था केली जाते तर काही ठिकाणी देणगीदार किंवा डीपीसी मार्फत व्यवस्था केली जाते. सोलर महाग असल्यामुळे एकाच वेळी गुंतवणूक करावयाची म्हटले तर त्यासाठी बराच निधी लागेल. परंतु, आपण ऊर्जा विभागामार्फत ते करण्याचा प्रयत्न करू. यावर संचालक, महावितरण मंडळ यांनी यासंदर्भात अधिक माहिती देत सांगितले की, मेडा मार्फत काही ठिकाणी सुरू करण्यात आले आहे. पुढे समितीने विचारणा केली की, आपल्याला मेढा मार्फत सर्व ठिकाणी सुरूवात करता येणार नाही काय, यावर संचालक, महावितरण मंडळ यांनी विदित केले की, आम्ही यासाठी किती निधी लागेल याचा अभ्यास करून याबाबत शालेय शिक्षण विभागासमवेत चर्चा करू. या उत्तराचा अनुषंगाने समितीने मत व्यक्त केले की, सोलर सिस्टीम बसविली तर चांगले होईल. शाळेला जेवढे अनुदान मिळते त्यातून किरकोळ खर्च भागविला जातो. त्यामुळे विद्युत बिलासाठी पैसे शिल्लक राहत नाहीत. बजेटमधून निधीची व्यवस्था केली पाहिजे. यावर संचालक, महावितरण मंडळ यांनी विदित केले की, त्यासाठी किती निधी लागेल याचा अंदाज आल्यानंतर निधी कसा उभारावयाचा यावर चर्चा होऊ शकेल. यावर समितीने हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. आपण या संदर्भात कायम स्वरुपी उपाययोजना केली पाहिजे. जोपर्यंत कायम स्वरुपी व्यवस्था होत नाही तोपर्यंत विजेची जेवढी मागणी आहे तेवढे अनुदान शाळा अनुदानाच्या माध्यमातून रिलिज केले पाहिजे. शाळा अनुदानामध्ये वाढ केली पाहिजे. असे समितीने संबंधितांना निदेश दिले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत जळगांव जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, जळगांव जिल्ह्यातील एकूण १८४७ शाळांपैकी १२४८ शाळा डिजीटल झालेल्या असून ५७८ शाळांमधील एकूण रुपये ५६,७२,२८८,०० एवढ्या रक्कमेची वीज देयके वाणिज्यिक दराने आकारल्याने वीज जोडण्या तोडण्यात आल्या आहेत. किमान ५० टक्के शाळांची वीज जोडणी देयक प्रलंबित असल्यामुळे कापण्यात आलेले आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांना घरगुती दराने नव्हे, तर वाणिज्यिक दराने वीजदर आकारला जातो. हा दर परवडण्यायोग्य नसल्याने वीजदेयक थकीत राहिल्याने वीज जोडण्या तोडण्यात आलेल्या आहेत.

जळगांव जिल्ह्यामध्ये ३३०२ शाळांपैकी ४७८ शाळांना वीज पुरवठा सुरू नाही व १३४ शाळांना वीज उपलब्ध नाही. अशा एकूण ६१२ शाळांना वीज पुरवठा करण्यात येत नाही ही बाब अत्यंत खेदजनक असल्यामुळे समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. समितीच्या मते शाळांना कायमस्वरूपी योग्य दरात वीज पुरवठा झाला पाहिजे. शाळा डिजीटल करण्यासाठी सोयी सुविधा पुरविण्याची आवश्यकता आहे. वीजदराचा प्रश्न केवळ जळगांव जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण राज्याशी निगडित आहे ऊर्जा विभागाच्या अभिप्रायानुसार शैक्षणिक संस्थांना

वाणिज्यिक दराने आकारणी न करता सार्वजनिक सेवा या स्वतंत्र वर्गवारीच्या दराने आकारणी करण्यात येते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे वीजदर आदेश दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ या आदेशा पूर्वी शैक्षणिक सस्थांचा समावेश वाणिज्यिक वर्गवारीत करण्यात येत होता व दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ नंतर मात्र उच्चदाब व लघुदाबावर सार्वजनिक सेवा (PUBLIC SERVICES) ही नवी वर्गवारी लागू केली आहे. तथापि, १०० युनिट पेक्षा जादा वीज वापरासाठी सार्वजनिक सेवा दर आहेत किंवा कसे याबाबतची माहिती ऊर्जा विभागाच्या अभिप्रायामध्ये नमूद करण्यात आलेली नाही. शाळांना जे अनुदान प्राप्त होते त्यातून विद्युत देयकाचा खर्च भागविण्यात येतो, तथापि, शाळा अनुदानाची रक्कम अपुरी असल्यामुळे शासनाने त्यामध्ये वाढ करण्याची नितांत आवश्यकता आहे कारण शाळा अनुदान शालेय साहित्यासाठी वापरले जाते त्यामुळे विद्युत बिलासाठी रक्कम शिल्लक राहत नाही. सध्या सर्व शाळा खोल्यांमध्ये पंखे, ट्युब लाईट/बल्ब वापरण्यात येतात तसेच शाळा डिजीटल करण्याचे धोरण शासनाचे असल्यामुळे दुरध्वनीसंच, प्रोजेक्टर संगणकाचा देखील वापर होत आहे. **उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता शाळांमध्ये वीजेचा वापर वाढत आहे याकरीता मेडा (महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण) यांच्या माध्यमातून सौर ऊर्जेवर आधारित यंत्रणांचा वापर करून विद्युत उपकरणे बसविण्यात यावीत, यासाठी शालेय शिक्षण विभागाने व ऊर्जा विभागाने संयुक्तरित्या निधी उपलब्ध करून द्यावा व याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करावी जेणेकरून वीज देयकामध्ये कपात होऊ शकेल. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, जळगांव (प्रशासन)

### ग्रामीण पाणीपुरवठा अंतर्गत कार्यरत यांत्रिकी व भूजल विभागातील तीन कनिष्ठ अभियंत्याची अस्थायी पदे नियमित केल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत जळगांव जिल्हा परिषदेस भेट दिली. दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी समितीच्या गट क्र.३ ने जिल्ह्यातील काही पंचायत समित्यांना भेटी देऊन त्या क्षेत्रात झालेल्या कामांची पाहणी केली. कामांची पाहणी करीत असतांना समितीला प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार ग्रामीण पाणीपुरवठा अंतर्गत कार्यरत यांत्रिकी व भूजल विभागातील कनिष्ठ अभियंता श्री.सुभाष सूर्यवंशी, श्री.अविनाश सोनवणे व श्री.योगेश पाटील हे अस्थायी व देखभाल दुरुस्ती निधीतून वेतनावर हातपंप व वीजपंप देखभाल दुरुस्ती विभागासाठी कार्यरत व नियुक्त असतांना जिल्हा परिषदेने या कर्मचा-यांना बांधकाम विभागातील कायम वेतनावरील नियमित पदावर दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१५ च्या आदेशान्वये सामावून घेतले आहे. अशा प्रकारे सामावून घेणे चुकीचे व नियमबाह्य आहे. या संदर्भात जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची, शासनाची वा इतर वरिष्ठ मंत्रालयीन विभागाची परवानगी वा मान्यता नाही. या कर्मचा-यांच्या नियुक्ती संदर्भात तत्कालीन तीन मुख्य कार्यकारी अधिका-यांचे वेगवेगळे आदेश आहेत. या तिन्ही कर्मचा-यांचे शासनाच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधीन राहून दि.३१-१२-२०११ रोजी याच पदावर परस्पर समावेशनाचे आदेश तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती डांगे यांच्याकडून घेण्यात आले होते. परंतु या प्रकरणी फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर श्रीमती डांगे यांनी सदरहू आदेश रद्द करून त्यांच्यावर कारवाई करण्याचे संकेत दिले होते. परंतु जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागांनी कारवाईच्या नस्तीस विलंब लावून श्रीमती डांगे यांच्या बदलीनंतर नवीन आलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती उगले यांच्याकडून तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिका-यांचे आदेश दिनांक १२ जून, २०१२ रोजी रद्द करून घेतले. तद्नंतर या कर्मचा-यांची पुन्हा दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या आदेशान्वये समावेशनाचे नियुक्ती आदेश घेऊन नियुक्ती केली. श्रीमती उगले यांची बदली झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी असलेल्या श्री.पांडेय यांनी पुन्हा त्या कर्मचा-यांच्या बाबतीत नव्याने आदेश काढले. या प्रकरणी तत्कालीन तीन मुख्य कार्यकारी अधिका-यांनी तीन वेगवेगळे आदेश निर्गमित केलेले आहेत. या तिन्ही कर्मचा-यांना कोणत्या अधिका-याच्या प्रयत्नांमुळे कशाच्या आधारावर सेवेत सामावून घेण्यात आले या बाबतची चौकशी करून साक्षीच्या वेळी सविस्तर स्पष्टीकरण द्यावे. असे निदेश समितीने संबंधितांना दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) ग्रामीण पाणीपुरवठा अंतर्गत कार्यरत यांत्रिकी व भूजल विभागातील कनिष्ठ अभियंता हे अस्थायी व देखभाल दुरूस्ती निधीतून वेतनावर हातपंप व वीजपंप देखभाल विभागासाठी कार्यरत व नियुक्त असतांना जिल्हा परिषदेने या कर्मचा-यांना बांधकाम विभागातील कायम वेतनातील नियमित पदावर दिनांक ३१ ऑक्टोबर,२०१५ च्या आदेशान्वये चुकीच्या नियमबाह्यपणे सामावून घेतल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली.

(२) सदरहू कर्मचा-याच्या बाबतीत तत्कालीन तीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तीन वेगवेगळे आदेश निर्गमित केल्याने याबाबतची सखोल चौकशी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :–**

(१) ग्रामीण पाणीपुरवठा विभागांतर्गत कार्यरत यांत्रिकी व भूजल विभागातील तीन कनिष्ठ अभियंता यांची देखभाल दुरूस्ती निधीतून वेतनावर हातपंप व वीजपंप देखभाल दुरूस्तीसाठी बांधकाम विभागाच्या कायम वेतनावरील नियमित पदावर दिनांक च्या आदेशान्वये सामावून २०१५/१०/३१ घेण्यात आले होते. सदर कर्मचा-यांना सामावून घेण्याबाबत शासनाचा कोणताही शासन निर्णय परिपत्रक अस्तित्वात नसल्याने सदर कर्मचा-यांची केलेली नियुक्ती रद्द करण्यात आली आहे.

(२) सदरहू ३ कर्मचा-यांच्या बाबत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांनी तत्कालीन परिस्थिती नुसार आदेश दिलेले होते. तथापि संबंधित ३ कनिष्ठ / शाखा अभियंता यांची नियमित नियुक्ती रद्द करण्याचा अंतिम निर्णय घेण्यात आलेला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (उ.स.जि.प.आस्थापना) सदरची बाब जिल्हा परिषद स्तरावरील आहे.

## अभिप्राय व शिफारशी

ग्रामीण पाणीपुरवठा अंतर्गत कार्यरत यांत्रिकी व भूजल विभागातील तीन कनिष्ठ अभियंता अस्थायी व देखभाल दुरुस्ती निधीतून वेतनावर हातपंप व वीजपंप देखभाल विभागासाठी कार्यरत व नियुक्त असताना जिल्हा परिषदेने सदर कर्मचा-यांना बांधकाम विभागातील कायम वेतनातील नियमित पदावर दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या आदेशान्वये चुकीच्या व नियमबाह्यपणे सामावून घेतले. सदर कर्मचा-यांच्या बाबतीत तत्कालिन तीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तीन वेगवेगळे आदेश निर्गमित केल्याने याबाबत सखोल चौकशी करून केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झाली त्यानुसार उपरोक्त तीनही कर्मचा-यांना सामावून घेण्याबाबत शासनाचा कोणताही शासन निर्णय अथवा परिपत्रक अस्तित्वात नसल्याने सदर कर्मचा-यांची केलेली नियुक्ती रद्द करण्यात आली आहे. सदरहू तीन कर्मचा-यांच्या बाबत तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांनी तत्कालीन परिस्थितीनुसार आदेश दिलेले होते. तथापि, संबंधित तीन कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांची नियमित नियुक्ती रद्द करण्याचा अंतिम निर्णय घेण्यात आलेला आहे. **तथापि, प्रस्तुत प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता उपरोक्त तीन पदे नियमित करण्यासाठी एकूण तीन वेळा तत्कालिन तीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समावेशन नियुक्ती आदेश घेऊन नियुक्ती केली आहे. ही बाब समितीस अनाकलनीय वाटते, कारण उपरोक्त तीन पदांचे तीन वेळा समावेशन करण्याबाबतचे नियुक्ती आदेश काढल्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाचा अत्यंत ढिसाळ व नियोजन शुन्य कारभार असल्याचे दिसून येते. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. यासंदर्भात जिल्हा परिषद प्रशासनाने नियुक्तीबाबत ठोस निर्णय घेऊन पदे नियमित करण्यासाठी सुयोग्य नियोजन करण्यात यावे, व त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## परिशिष्ट—समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जळगांव**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(६) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**जिल्हा परिषद पदाधिकारी :-**

(१) श्रीमती उज्वला पाटील, अध्यक्षा, जि. प. जळगांव

(२) श्री. नंदकिशोर भागवत महाजन, उपाध्यक्ष, जि. प. जळगांव

(३) श्रीमती माधुरी नेमाडे, सभापती, पंचायत समिती, रावेर

(४) श्री. सुभाष पाटील, सभापती, पंचायत समिती, पाचोरा

(५) श्री. प्रभाकर गोडू सोनवणे, सभापती, समाजकल्याण, जि. प. जळगांव

(६) श्री. दिलीप पाटील, सभापती, आरोग्य समिती, जि. प. जळगांव

(७) श्री. पोपट भोळे, सभापती, शिक्षण, क्रीडा व अर्थ विभाग, जि. प. जळगांव

(८) श्री. प्रतापराव पाटील, सदस्य, जि. प. जळगांव

(९) श्री. नानाभाऊ महाजन, सदस्य, जि. प. जळगांव

(१०) श्री. रविंद्र पाटील, सदस्य, जि. प. जळगांव

(११) श्रीमती पल्लवी सावकारे, सदस्य, जि. प. जळगांव

**ग्रामविकास विभाग :**

(१) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. अ. रा. आठल्ये, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, जळगांव :**

(१) श्री. कौस्तुभ दिवेगांवकर, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. संजय मस्कर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. राजन पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

(४) श्री. राजन पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता

(५) श्री. विक्रांत बगाडे, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए.

(६) श्री. नरेंद्र महाजन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(७) डॉ. अनिता राठोड, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(८) श्री. बाळासाहेब बोटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग

(९) डॉ. वर्षा फडोळ, सहायक आयुक्त, नाशिक विभाग

(१०) श्री. रफिक तडवी, महिला व बालविकास अधिकारी

(११) डॉ. प्रकाश इंगळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१२) श्री. मधुकर चौधरी, कृषि विकास अधिकारी

(१३) डॉ. कमलापूरकर बी. एस., जिल्हा आरोग्य अधिकारी

(१४) श्री. महाजन पंडित, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१५) श्री. बी. जे. पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१६) सौ. सुनंदा नरवाडे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१७) श्री. राजन नाईक, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग

(१८) श्री. प्रदीप कापडणीस, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग

(१९) श्री. ए.बी.जोशी, गटविकास अधिकारी, जामनेर

(२०) श्री. डी.आर.लोखंडे, गटविकास अधिकारी, मुक्ताईनगर

(२१) सौ. दिपाली कोतवाल, गटविकास अधिकारी, भडगांव

(२२) सौ. स्नेहा कुडचे, गटविकास अधिकारी, एरंडोल

(२३) सौ. सोनिया नाकाडे, गटविकास अधिकारी, रावेर

(२४) श्री. गणेश चौधरी, गटविकास अधिकारी, पाचोरा

(२५) श्री. अशोक पटाईत, गटविकास अधिकारी, अंमळनेर

(२६) श्री. एस. बी. मावळे, गटविकास अधिकारी, भुसावळ

(२७) श्री. वाय. पी. सपकाळे, गटविकास अधिकारी, यावल

(२८) श्री. एस. डी. जाधव, गटविकास अधिकारी, धरणगांव

(२९) श्री. अशोक बावस्कर, प्रभारी गटविकास अधिकारी, बोदवड

(३०) श्री. अशोक आर.दांडगे, गटविकास अधिकारी, चोपडा

(३१) श्री. आर.के. गिरासे, गटविकास अधिकारी, पारोळा

(३२) श्री. अजितसिंग पवार, प्रभारी गटविकास अधिकारी, चाळीसगांव

(३३) डॉ. मंजुश्री गायकवाड, प्रभारी गटविकास अधिकारी, जळगांव

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जळगांव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील जळगांव जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जळगांव**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग :**

(१) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. अ. रा. आठल्ये, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, जळगांव :**

(१) श्री. कौस्तुभ दिवेगांवकर, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. संजय मस्कर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. विक्रांत बगाडे, प्रकल्प संचालक, डी. आर. डी. ए.

(४) श्री. ए. बी. जोशी, गटविकास अधिकारी, जामनेर

(५) श्री. डी. आर. लोखंडे, गटविकास अधिकारी, मुक्ताईनगर

(६) सौ. दिपाली कोतवाल, गटविकास अधिकारी, भडगांव

(७) सौ. स्नेहा कुडचे, गटविकास अधिकारी, एरंडोल

(८) सौ. सोनिया नाकाडे, गटविकास अधिकारी, रावेर

(९) श्री. गणेश चौधरी, गटविकास अधिकारी, पाचोरा

(१०) श्री. अशोक पटाईत, गटविकास अधिकारी, अंमळनेर

(११) श्री. एस. बी. मावळे, गटविकास अधिकारी, भुसावळ

(१२) श्री. वाय. पी. सपकाळे, गटविकास अधिकारी, यावल

(१३) श्री. एस. डी. जाधव, गटविकास अधिकारी, धरणगांव

(१४) श्री. अशोक बावस्कर, प्रभारी गटविकास अधिकारी, बोदवड

(१५) श्री. अशोक आर.दांडगे, गटविकास अधिकारी, चोपडा

(१६) श्री. आर.के. गिरासे, गटविकास अधिकारी, पारोळा

(१७) श्री. अजितसिंग पवार, प्रभारी गटविकास अधिकारी, चाळीसगांव

(१८) डॉ. मंजुश्री गायकवाड, प्रभारी गटविकास अधिकारी, जळगांव

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जळगांव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात जळगांव जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जळगांव**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१०) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. अ. रा. आठल्ये, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

(शा.म.मु.) एचबी ८२४—८ (४५०—६—२०१९)

**जिल्हा परिषद, जळगांव**

(१) श्री. कौस्तुभ दिवेगांवकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. संजय मस्कर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. राजन पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग
(४) श्री. राजन पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता
(५) श्री. विक्रांत बगाडे, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए.
(६) श्री. नरेंद्र महाजन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(७) डॉ. अनिता राठोड, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(८) श्री. बाळासाहेब बोटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग
(९) डॉ. वर्षा फडोळ, सहायक आयुक्त, नाशिक विभाग
(१०) श्री. रफिक तडवी, महिला व बालविकास अधिकारी
(११) डॉ. प्रकाश इंगळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१२) श्री. मधुकर चौधरी, कृषि विकास अधिकारी
(१३) डॉ. कमलापूरकर बी. एस., जिल्हा आरोग्य अधिकारी
(१४) श्री. महाजन पंडित, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(१५) श्री. बी.जे.पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१६) सौ. सुनंदा नरवाडे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा
(१७) श्री. राजन नाईक, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग
(१८) श्री. प्रदीप कापडणीस, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग
(१९) श्री. ए. बी. जोशी, गटविकास अधिकारी, जामनेर
(२०) श्री. डी. आर. लोखंडे, गटविकास अधिकारी, मुक्ताईनगर
(२१) सौ. दिपाली कोतवाह, गटविकास अधिकारी, भडगांव
(२२) सौ. स्नेहा कुडचे, गटविकास अधिकारी, एरंडोल
(२३) सौ. सोनिया नाकाडे, गटविकास अधिकारी, रावेर
(२४) श्री. गणेश चौधरी, गटविकास अधिकारी, पाचोरा
(२५) श्री. अशोक पटाईत, गटविकास अधिकारी, अंमळनेर
(२६) श्री. एस. बी. मावळे, गटविकास अधिकारी, भुसावळ
(२७) श्री. वाय. पी. सपकाळे, गटविकास अधिकारी, यावल
(२८) श्री. एस. डी. जाधव, गटविकास अधिकारी, धरणगांव
(२९) श्री. अशोक बावस्कर, प्रभारी गटविकास अधिकारी, बोदवड
(३०) श्री. अशोक आर.दांडगे, गटविकास अधिकारी, चोपडा
(३१) श्री. आर.के. गिरासे, गटविकास अधिकारी, पारोळा
(३२) श्री. अजितसिंग पवार, प्रभारी गटविकास अधिकारी, चाळीसगांव
(३३) डॉ. मंजुश्री गायकवाड, प्रभारी गटविकास अधिकारी, जळगांव

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जळगांव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील जळगांव जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०१८**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(७) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(८) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१०) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय,

**मंत्रालयीन विभागीय सचिव :-**

(१) श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) श्री. विजय कुमार, अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग

(४) श्री. अमिताभ गुप्ता, प्रधान सचिव, गृह विभाग

(५) श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

(६) श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

(७) श्री. संजीव कुमार, संचालक, महावितरण मंडळ

(८) श्री. एन. व्ही. शिंदे, मुख्य अभियंता व प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे प्रतिनिधी

(९) श्री.सी.आर.गजभिये, मुख्य अभियंता व विकास (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

(१०) श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(११) श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१२) डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१३) श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग

(१४) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१५) श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१६) श्री. किरण पाटील, उप सचिव, कृषी विभाग

(१७) श्री. खा. म. नानद, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१८) श्री. विजयकुमार कलवले, सह संचालक, जलसंधारण विभाग

(१९) श्रीमती सु. प्र. आहिरराव, सहाय्यक संचालक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**जिल्हा परिषद, जळगांव :-**

(१) श्री. शिवाजी दिवेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(२) श्री. संजय मस्कर,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(३) श्री. पी. एस. अक्काडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, जळगांव

(४) श्री. नरेंद्र महाजन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(५) श्री. भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जळगांव

(६) डॉ. अनिता राठोड, समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(७) श्री. सुनंद नरवाडे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, जळगांव

(८) श्री. आर. के. नाईक, कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव

(९) श्री. प्रविण मुंढे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग, प्रधान सचिव, गृह विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, संचालक, महावितरण मंडळ, मुख्य अभियंता व प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे प्रतिनिधी, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, कृषी विभाग, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, मुख्य अभियंता व विकास (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग), सह संचालक, जलसंधारण विभाग, सहाय्यक संचालक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगांव यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ३० जानेवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)
(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग
(२ ) श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग
(३) श्री. आर. व्ही. पानसे, सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग
(४) श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग
(५) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, जळगांव**

(१) डॉ. बी. एन. पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(२) श्री. संजय मस्कर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(३) श्री. बी. एस. अककाडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, जळगांव

(४) श्री. रफिक तडवी, महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(५) श्री. बी. ए. बोटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, जळगांव

(६) श्री. आर. के. नाईक, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन), जिल्हा परिषद, जळगांव

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगांव यांची उर्वरित साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ११ जून, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. सुनिल भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. म. र. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(३) श्री. कि. शा. परब, उप सचिव, जलसंपदा विभाग

(४) श्री. वि. वि. बेंद्रे, अवर सचिव, जलसंपदा विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक :**

श्री. आर. आर. माने, विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, नाशिक

**जिल्हा परिषद, जळगांव :**

(१) डॉ. बी. एन. पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

(२) श्री. वि. एस. अककाडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(३) श्री. एस. आर. येवले, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात जळगांव जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, उप सचिव, जलसंपदा विभाग, अवर सचिव, जलसंपदा विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगांव यांची उर्वरित साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २७ जून २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :-**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(३) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(४) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(५) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(६) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(७) श्री. भारत भालके, वि.स.स.

(८) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(९) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(१२) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :-**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(३) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत बत्तीसाव्या व तेहतीसाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करून ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई